Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

* वर्ष ५० * अंक २६९ * * अमरावती * बुधवार, दिनांक २६ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी अंकाच्या फक्त 4 रुपयात

## दिल्लीत पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांचे बजेट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंगळवारी पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. महिला समृद्धी योजनेसाठी ५१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे दिल्लीतील महिलांना दरमहा २५०० रुपये दिले जातील. यमुना स्वच्छ करण्यासाठी ९ हजार कोटी रुपयांचे बजेट आहे.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आयुष्मान योजनेसाठी २१४४ हजार कोटी रुपयांचे बजेट ठेवले आहे. केंद्र सरकारकडून तुम्हाला ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार नक्कीच मिळतील. याशिवाय, दिल्ली सरकार त्यांच्याकडून ५ लाख रुपये देखील जोडत आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## वानराच्या गळ्यात मोत्याची माळ

सध्या बांगलादेशचे तात्पुरते राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून न आलेल्या मोहम्मद युनूस यांची नेमणूक झालेली आहे. निवडणुकीतून निवडून आलेल्या आणि बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या शेख मुजीबूर रहमान यांची कन्या शेख हसीना यांच्याविरुद्ध काही अतिरेक्यांनी अतिरेक करून बांगलादेशात असंतोष पेटविलेला आहे. अखेर शेवटच्या घटकेला शेख हसीना यांना बांगलादेशातून पलायन करावे लागले. त्या पलायनाला एक तास जरी उशीर झाला असता. तरी जातीयवादी आक्रमक अतिरेक्यांनी त्यांची हत्याच केली असती. त्यांचे विमान आधी भारतात उतरले. नंतर त्या इतर एखाद्या देशात आश्रय घेतील, असा कयास लावला जात होता. पण ते जमले नाही आणि त्यांना भारतातच राहावे लागले. ज्या शेख मुजीबूर रहमान यांनी पाकिस्तानच्या तावडीतून बांगलादेश मुक्त केला. त्यांच्याच स्मृती आता नष्ट केल्या गेल्या. बंगाली अतिरेकी आणि त्यांना फूस देणारे पाकिस्तानी लष्करवाले यांनी बांगलादेशचा सत्यानाश करण्याचे ठरविलेले दिसते. बलुचिस्तानात पाकिस्तान विरुद्ध प्रचंड आक्रोश आहे. भारताची फाळणी झाली तेव्हा बलुचिस्तान स्वतंत्र ठेवण्यात येईल, असा तेथील बादशहाचा इरादा होता. पण पाकी लष्कराने बळजबरीने बलुचिस्तानला स्वतंत्रता मिळू दिली नाही. आज पाकिस्तानातील 43% भूभाग बलुचिस्तानमध्ये आहे. त्याची लोकसंख्या तीन कोटी पेक्षाही कमी आहे. हा प्रदेश खनिज संपत्तीने समृद्ध असल्यामुळे पाकिस्तानला कसेही करून बलुचिस्तानला आपल्यापासून दूर करायचे नाही. पाकिस्तानात सिंधी, पश्तूनी, मुजाहिद वगैरे सारख्या मुस्लिम जमाती आहेत. मात्र पाकिस्तानी लष्कराला हे दादागिरी करण्याचे ठिकाण आहे, असे वाटते. पंजाबी मुस्लिमांनी बलुचिस्तानला स्वातंत्र्यलढा लढण्यास प्रवृत्त केले आहे. पण तो भूभाग पाकिस्तानला लागून असल्यामुळे पाकच्या लष्करासमोर बलुच योद्धे टिकू शकत नाहीत. 1971 साली सर्वाधिक लोकसभेच्या जागा जिंकूनही शेख मुजीबुर रहमान यांना आताच्या पाकड्यांनी सत्तेवर बसू दिले नाही. त्यांच्या आवामी लीग या पक्षाचे बहुमत असताना सुद्धा त्यावेळी झुल्फिकार अली भूत्तो यांनी प्रचंड विरोध केला आणि ते सत्तेवर आले. त्यानंतर नेहमीप्रमाणे लष्करी उठाव होऊन भुत्तो यांना फासावर लटकावे लागले. त्यानंतर त्यांच्या कन्येलाही अपघातात मरण्यात आले. पण आता हे पाकडे बांगलादेशचे वाकडे करण्यासाठी त्यांच्या सवयीप्रमाणे येथील अतिरेक्यांना मदत करीत आहेत. ही मदत आर्थिक नाही, त्या स्वरूपाची मदत करण्याऐवजी कुवत पाकिस्तानामध्ये नाही. पण इस्लामच्या नावावर अनेक अतिरेक्यांनी शेख हसीनाची सत्ता उलथवून टाकण्यासाठी फार मोठा प्रयत्न केला आणि तो यशस्वी ठरला. त्यावेळी घाईघाईत एका बँकेचे अध्यक्ष असलेल्या आणि शेख हसीना यांचे कट्टर विरोधक असलेल्या मोहम्मद युनूस यांना तात्पुरते सत्तेवर बसविले गेले. अजूनही त्या ठिकाणी निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल दिसत नाही. आवामी लीगच्या अनेक नेत्यांना कोणतेही कारण नसताना अतोनात त्रास देण्यात येत आहे. आवामी लीग निवडणूक लढवूच नये. अशी पावलेही उचलण्यात येत आहेत. शेख हसीना भारताशी चांगले संबंध ठेवून बांगलादेशच्या विकासासाठी तत्पर होत्या. त्यांच्या कार्यकाळात बांगलादेशची बरीच प्रगती झाली. पण अमेरिकेलाही शेख हसीना त्यांचा अलिप्तपणा पचला नाही. त्यामुळे पाकिस्तानचे भावनात्मक आवाहन आणि अमेरिकेचा पैसा यामुळे बांगलादेशचे लोकनियुक्त सरकार पाडले गेले आणि शेख हसीना यांना देश सोडावा लागला. मोहम्मद युनूस यांनी राज्यकारभार हाती घेतला. पण त्यांच्या कार्यकाळात त्या देशातील हिंदूंवर हल्ले होऊ लागले. त्याला आवर घालणे त्यांना जमले नाही. आता बांगलादेशात अशी काही अवस्था निर्माण झालेली आहे की, कोणाचा पायपोस कोणाच्या हातात नाही. भारताशी सहकार्य केल्याशिवाय बांगलादेशाची अर्थव्यवस्था चालू शकत नाही. पण मोहम्मद युनूस सारख्या केवळ अर्थतज्ज्ञ वानराच्या हातात मोत्याची माळ दिल्यामुळे हा माणूस त्या माळेचे मणी चावून चावून फोडून फेकून देत आहे. अशा स्थितीत पाकिस्तान मित्र अतिरेक्यांना आणि अनेक वाह्यात तरुणांना मोकळे मैदान मिळालेले आहे. आता बांगलादेशात पुन्हा लष्कराची सत्ता येते की काय, हाच एक प्रश्न शांततावादी जनतेच्या मनात रेंगाळत आहे. अल्लाह बांगलादेशचे रक्षण करो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## आदित्य ड्रग्जच्या व्यापारात, उद्धव ठाकरेही आरोपी...

### दिशा सालियन मृत्यू प्रकरण

# वडिलांचे गंभीर आरोप!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

दिशा सालियनच्या वडिलांनी आज मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपल्या मुलीच्या हत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

या प्रकरणी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करत या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आदित्य ठाकरे यांना वाचवण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला, असा आरोप त्यांनी केला आहे.

आदित्य ठाकरे यांचा ड्रगजच्या व्यापारात हात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या आरोपांमुळे राज्याचे राजकारण अधिकच तापण्याची चिन्हे आहेत.



दिशा सालियनचा ८ जून २०२०रोजी संशयास्पद मृत्यू झाला होता. पण ही आत्महत्या होती की हत्या? यावरून बरेच राजकारण रंगले आहे. पण आता दिशाचे वडील सतीश सालियन यांनी हायकोर्टात याचिका दाखल करून आपल्या मुलीची सामूहिक अत्याचारानंतर हत्या करण्यात आल्याचा आरोप केला आहे.

या प्रकरणी त्यांनी मंगळवारी मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांशी बोलताना त्यांच्या वकिलांनी या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी करण्यात आल्याचे सांगितले.

**कुणाकुणाचा सहभाग?**

सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा म्हणाले की, आम्ही आमची तक्रार मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांकडे (गुन्हे) दिली आहे. त्यांनी सीपींशी चर्चा करून आमची तक्रार दाखल करून घेतली आहे.

आता आरोपींना केव्हा अटक करणार? याची जबाबदारी पोलिसांवर आहे. आरोपींमध्ये आदित्य ठाकरे, डिनो मोरिया, सुरज पंचोली, त्यांचे अंगरक्षक, परमबीर सिंह, सचिन वाझे, रिया चक्रवर्ती यांचा समावेश आहे.

परमबीर सिंह यांनी हे प्रकरण दाबण्याच्या प्रकरणातील मुख्य मास्टरमाईंड आहेत. परमबीर यांनी या प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव आल्यानंतर कव्हरअप करण्यासाठी एक पत्रकार परिषद घेतली.

त्यात त्यांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये घटनास्थळी कोणताही राजकारणी आला नसल्याचा दावा केला. पण मोबाईल टॉवरच्या लोकेशनपासून प्रत्यक्षदर्शींच्या जबाबापर्यंत सर्वच गोष्टी त्यांचा हा दावा खोटा असल्याचे सिद्ध करतात. इतरही अनेक गोष्टी आमच्या तक्रारीत नमूद आहेत.

## मंत्री जयकुमार गोरे यांना अडकवण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :



मंत्री जयकुमार गोरे यांना अडकवण्याच्या प्रकरणात शरद पवार यांच्या पक्षाचा मोठा हात असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केला आहे.

या प्रकरणात सुप्रिया सुळे आणि रोहित पवार हे आरोपी तुषार खरात याच्या संपर्कात होते. या प्रकरणाचे विरोधात जे व्हिडिओ तयार केले गेले, ते आधी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांना पाठवण्यात आले असल्याचा मोठा आरोप देखील फडणवीस यांनी केला आहे. त्यामुळे आता या प्रकरणावरून राज्यभरात चांगलाच गोंधळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा**

आप इतना भी गरज गरज के ना बरसों,
की मैं आंधी तूफान या सैलाब बन जाऊं।
खैर मुश्किल मुझ में तो अभी साख बाकी है,
आप खुद अपनी फितरत के बारे में सच बोलो,
आप में वह पहले वाली बात कहा बाकी है।

अशा शेरोशायरीने फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जितेंद्र आव्हाड ज्यावेळी राज्यातील घटना घडामोडींबद्दल बोलत होते. त्यावेळी ते बांगलादेश विषय बोलता की काय? असा मला प्रश्न पडत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दंगेखोर आणि बलात्कार करणा?यांचा एवढा पुळका का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विचारला आहे.

अक्षय शिंदे याचा एनकाऊंटर झाला नसता तर चांगले झाले असते. मात्र तो स्वातंत्र्य सेनानी असल्यासारखी छाती बडवली जात असल्याचा आरोप फडणवीस यांनी केला आहे. दंगेखोर आणि बलात्कार यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे. मात्र त्यांच्या विषयी कोणाच्या मनात संवेदना निर्माण झाली असेल तर ते योग्य नाही. त्या संदर्भात त्यांची मने तपासूनच पहावी लागतील, असे फडणवीस म्हणाले आहे.

विरोधकांनी कितीही प्रयत्न केला तरी आम्ही तिघे एकमेकांच्या पायात पाय घालणार नाही. तर एकमेकांच्या हातात हात घेऊन काम करणारे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दादा एकदम दराडून बोलतात, त्यामुळे त्यांच्याविषयी कोणी बोलत नाही. मात्री आम्ही दोघे, शांततेत बोलत असतो. मात्र तुम्ही कितीही काड्या घालण्याचा प्रयत्न केला, तरीही आमच्यात एकी कायम राहणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

## समृद्धीवरच्या अपघातात सोनू सूदची पत्नी जखमी

### भाच्यासह दोघांवर नागपुरात उपचार सुरू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.२५ :

बॉलिवूड अभिनेता सोनू सूद याची पत्नी सोनाली सूद मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावर झालेलया भीषण कार अपघातात गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेत सोनाली यांचा भाचाही जखमी झाला आहे. या दोघांवर नागपूर येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच सोनू सूद तातडीने नागपुरात दाखल झाला आहे.

सोनाली सूद यांचा सोमवारी रात्री मुंबई - नागपूर हायवेवर अपघात झाला. त्यांची कार एका ट्रकला धडकली. त्यात गंभीर जखमी झाल्या. हा अपघात झाला तेव्हा त्यांच्यासोबत त्यांची बहीण व भाचा सोबत होता. सोशल मीडियावर सोनाली सूद यांच्या गाडीचे काही फोटो व्हायरल झालेत. त्यात कारचा समोरील भाग अक्षरशः चक्काचूर झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सूद यांच्या कारने अतिशय वेगाने ट्रकला धडक दिली असावी असा अंदाज बांधला जात आहे.

या अपघातानंतर सोनाली सूद व त्यांचा भाचा या दोघांना नागपूर येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार केले जात आहेत. दुसरीकडे, या अपघाताची माहिती कळताच सोनू सूद तातडीने नागपूरच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी डॉक्टरांशी चर्चा करून आपल्या पत्नी व भाच्याच्या प्रकृतीची माहिती घेतली. ते सध्या त्यांच्यासोबतच आहेत. सोनाली व त्यांच्या भाच्याला पुढील ४८ ते ७२ तास सातत्याने निगराणी व वैद्यकीय देखभालीत ठेवले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अभिनेता सोनू सूदने या अपघाताची पुष्टी केली आहे.

## आमिर खानने घेतली धनंजय देशमुखांची भेट

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :

बॉलिवूड अभिनेता आमिर खान याने मस्साजोग येथे दिवंगत सरपंच संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. आमिरने देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांना धीर दिला.

पुण्यामध्ये पाणी फाउंडेशनचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला धनंजय देशमुख यांच्या संतोष देशमुख यांचा मुलगा विराज देशमुख उपस्थित होते. यावेळी आमिर खाने धनंजय देशमुख यांची आस्थेने विचारपूस केली. आमिर खानने विराजला पोटाशी धरून घट्ट मिठी मारली.

### संतोषच्या मुलाला मारली घट्ट मिठी



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणाला १०५ दिवस उलटून गेले आहेत. या प्रकरणात ८ आरोपींना अटक झाली असून न्यायालयात खटला सुरु आहे. मात्र, कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यातील राजकारणाबरोबरच सामाजिक क्षेत्र ढवळून निघालेले आहे. अशातच आमिर खान याने संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी, आमिर खान भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी आमिरने देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान आमिर खानने धनंजय देशमुख यांची व्यथा ऐकून घेतली. यानंतर आमिर खान भावूक झाला होता. त्याने संतोष देशमुख यांचा मुलगा विराज देशमुख याला कडाडून मिठी मारली. आमिरची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव हिने देखील धनंजय देशमुख यांना धीर दिला.

## भंडारा तहसीलदारांची विभागीय चौकशी

### विधानसभेत घोषणा

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि.२५ :

तहसीलदार विनीता लांजेवार यांना भ्रष्टाचार प्रकरणात निलंबित करण्यात आले होते. मात्र त्यांना मॅटने स्थगिती दिली. त्यावर असहमती दर्शवत आमदार भोंडेकर यांनी भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या कार्यक्षेत्रात लांजेवार कार्यरत कशा राहू शकतात? असा प्रश्न केला. यावर उत्तर देताना भंडाऱ्याच्या महिला तहसीलदाराने भ्रष्टाचाराच्या सर्व मर्यादा पार केल्यात, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी आजपासून त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी सुरू करीत असल्याचे जाहीर केले.

आदेश नसतांना शेतीला अकृषक परवानगीचे आदेश दिल्याप्रकरणी भंडाराच्या



तहसीलदार विनीता लांजेवार यांना महसूल खात्याने निलंबित केले होते.

या आदेशाविरुद्ध लांजेवार यांनी मॅट मध्ये धाव घेतली. तेथे त्यांच्या या निलंबन आदेशाला स्थगिती देण्यात आली. मात्र मॅटचा निर्णय हा एकतर्फी असल्याचा आरोप आमदार भोंडेकर यांनी विधानसभेत केला.

या निर्णयाच्या विरोधात शासन अपील करणार का? भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असलेल्या तहसीलदार लांजेवार यांची अँटी करप्शन आणि विभागीय चौकशी होणार का? असा प्रश्न उपस्थित केला. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आमदार भोंडेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय चौकशीची घोषणा केली.

## मंगळवार ठरला घातवार : चौघे ठार

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि.२५ :

जिल्ह्यासाठी मंगळवार घातवार ठरला. दोन वेगवेगळ्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. चिखली तालुक्यातील चिखली-जाफ्राबाद मार्गावर मंगळवारी दुपारी भीषण अपघात झाला. भरधाव दुचाकीचे नियंत्रण सुटल्याने ती रस्त्या लगताच्या झाडावर आदळली. यात दुचाकी वरील तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला. पळसखेड दौलत गावाच्या समोर भोकरवाडीजवळ हा अपघात झाला.

घटनेची माहिती मिळताच चिखली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ठार झालेले तिघेही तरुण मराठवाड्यातील सिल्लोड ( जिल्हा छत्रपती संभाजी नगर ) तालुक्यातील पिंपरी येथील रहिवासी आहेत. रोहित महादू चाबूकस्वार (वय २४), शुभम रमेश चाबूकस्वार (वय २५), सोनू सुपडू उसरे (वय २३) अशी अपघातात ठार झालेल्या तरुणांची नावे आहेत.

हे तिघे युवक एम एच १५/०७५७ क्रमांकाच्या पल्सर वाहनाने कुंभारी येथे जात होते अशी प्राथमिक माहिती आहे. घटनेचा विस्तृत तपशील मिळाला नाही. पोलीस कारवाई सुरु होती.

### भरधाव वाहनाने शेतकऱ्याला चिरडले

वाहन अपघातात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तांदूळवाडीतील वाणी मळ्याजवळ आज मंगळवारी, २५ मार्च रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. धाड मार्गावरील तांदूळवाडीत आज, रस्ता ओलांडणाऱ्या शेतकऱ्याला भरधाव वाहनाने चिरडले. या अपघातात शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. बळीराम पांडुरंग वाणी (५६), रा. तांदुळवाडी, ता. बुलढाणा असे मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. भरधाव कारने त्यांना धडक दिली. त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आला आहे. बळीराम वाणी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे दुःखाचे सावट पसरले आहे.

# नक्षल नेता मुरलीसह तिघांचा खात्मा!

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि.२५ :

छत्तीसगडच्या दंतेवाडात झालेल्या चकमकीत जहाल नक्षल नेता मुरलीसह तीन नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे.

२५ मार्च रोजी ही चकमक उडाली. यात २५ लाखांचे इनाम असलेला जहाल नक्षलवादी व दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य सोनासाई उर्फ सुधीर उर्फ मुरली उर्फ रामसाई (६२)याचा समावेश आहे. नक्षल चळवळीत पदार्पण केल्यानंतर सुरुवातीला पाच वर्षे तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय होता. चकमकीत तो ठार झाल्याने नक्षलवादी वादी चळवळीला धक्का बसला आहे.

दंतेवाडा व बिजापूर जिल्ह्यांच्या सीमेवरील गिरसापारा, नेलगोडा, बोडगा व इकेली या भागात काही नक्षलवाद्यांचा वावर असल्याची माहिती मिळाल्यावरुन सुरक्षा दलातील राखीव पोलीस जवान (डीआरजी), स्फोटकविरोधी पथकाने दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलविरोधी अभियान हाती घेतले होते. २५ मार्च रोजी सकाळी गिदम पोलीस ठाण्याच्या हद्दीत नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले.

चकमकीत जहाल नक्षलवादी मुरलीसह अन्य दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले. अन्य दोघांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे. परिसरात नक्षलविरोधी अभियान गतिमान केल्याची माहिती दंतेवाडाचे उप पोलीस महानिरीक्षक कमलोचन कश्यप यांनी दिली.

घटनास्थळी १२ बोअर रायफल, इंसास रायफल, घातक स्फोटक असा शस्त्रसाठा आढळून आला. याशिवाय दैनंदिन गरजेच्या वस्तूही आढळून आल्या. शस्त्रांसह सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. बस्तर परिक्षेत्रात २०२५ मध्ये आतापर्यंत तीन महिन्यांत वेगवेगळ्या चकमकींमध्ये शंभर नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा जवानांना यश आले.

### मुरलीचा नक्षल प्रवास

सोनासाई उर्फ मुरली हा मूळचा तेलंगणा राज्यातील वारंगल जिल्ह्यातील रहिवासी होता. अहेरी दलममध्ये १९९५ ते १९९७ पर्यंत त्याने काम केले, त्यानंतर १९९७ ते १९९९ पर्यंत तो पेरिमिली दलममध्ये सक्रिय होता. पुढे त्याने गडचिरोली जिल्हा सोडला व आपला मुक्काम अबुजमाडमध्ये हलविला.

## महाराष्ट्रात फिरतो एक नेपाळी...

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

### अनिल परबांचा नीतेश राणेंवर घणाघात

शिवसेना आमदार अनिल परब यांनी मंगळवारी विधान परिषदेत भाजप आमदार नीतेश राणे यांच्यावर कडाडून हल्ला चढवला. त्यांनी त्यांचा उल्लेख 'नेपाळी' असा केला.

महाराष्ट्रात एक नेपाळी आहे. मीच हिंदू धर्म वाचवू शकतो असे त्याला वाटते, असे ते म्हणालेत. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे परब यांच्या बाजूलाच बसले होते हे विशेष. अनिल परब म्हणाले की, हल्ली काय झाले आहे की मांसाहार करायचा नाही असे कुणीतरी सांगत आहे. त्यांना हा अधिकार कुणी दिला? मटण कोणते खायचे, झटका मटण खायचे की हलाल खायचे हे तुम्ही सांगणार का? राज्यात हिंदू - मुस्लिम वाद होतील असे वातावरण हुतुपुरस्सर तयार केले जात आहे.

## आमदार संजय गायकवाड यांची संजय राऊत यांना शिवीगाळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

कॉमेडियन कुणाल कामरा प्रकरणावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. कामरा आणि माझा डीएनए सारखाच असल्याचे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केल्यानंतर शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट राऊत यांना शिवीगाळ केली. यामुळे विधानभवन परिसरात मोठा गदारोळ झाला.

संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, कुणाल कामरा चुकला असेल तर कायद्याने कारवाई करावी. मात्र, कामरा आणि माझा डीएनए सारखाच आहे. राऊत यांच्या या वक्तव्यावर शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड भडकले आणि त्यांनी पातळी सोडून अपशब्द वापरत राऊत यांना शिवीगाळ केली.

गायकवाड म्हणाले, कामराने माफी मागणार नाही, असे म्हणत जी मुजोरी दाखवली आहे, ती पाहता त्याला चांगलाच माज चढलाय. ही मस्ती कोणाच्या भरोशावर आहे? त्याचा माज आमचे शिवसैनिक उतरवल्याशिवाय राहणार नाही. राऊत यांच्या 'डीएनए' वक्तव्यानंतर संजय गायकवाड यांनी वापरलेल्या अपशब्दांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सत्ताधारी आमदाराने अशा पद्धतीने खासदारावर केलेली शिवीगाळ ही अभूतपूर्व असून, यावरून सत्ताधाऱ्यांची बेताल भाषा पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा सुरू आहे.

## अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष

### एकमेव अर्ज आल्याने बिनविरोध निवड; राहुल नार्वेकर करणार औपचारिक घोषणा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्ष राहुल नार्वेकर उद्या त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा करतील.

विधानसभेच्या उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या राजकुमार बडोले, संजय बनसोडे व अण्णा बनसोडे या ३ नेत्यांची नावे चर्चेत होती. अखेर या अण्णा बनसोडे यांनी बाजी मारली. या पदासाठी महायुतीकडून अण्णा बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता. त्यामुळे त्याची या पदावर बिनविरोध निवड झाली आहे.

अण्णा बनसोडे यांनी महापालिकेत ३ टर्म नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांनी स्थायी समितीचे अध्यक्षपदही भूषविले आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आहेत. ते पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभेत नेतृत्व करतात. ते २००९ मध्ये पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. २०१९ मध्ये ते पुन्हा विधानसभेत पोहोचले.

# एसटीचे स्मार्ट कार्ड ४ वर्षांपूर्वी बंद १० हजारांत बनावट कार्ड

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २५ : राज्य शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकार, दिव्यांग आणि सवलतीस पात्र विविध पुरस्कारप्राप्त व्यक्तींना एसटी महामंडळाच्या बसेसमध्ये मोफत प्रवासासाठी २०२०-२१-मध्ये वितरित स्मार्ट कार्डची वर्षभराची मुदत संपल्यानंतर ते कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत. परंतु, तरी ८ ते १० हजारांत बनावट स्मार्ट कार्ड काढून नाशिक जिल्ह्यात १०० हून अधिक तोतया पत्रकार, दिव्यांग मोफत प्रवासाचा लाभ उठवत शासनाची फसवणूक करत आहेत.




निफाडमध्ये हे बनावट कार्ड देणारी टोळी कार्यरत आहे.

जिल्ह्यात ११४ अधिस्वीकृतीधारक पत्रकार आहेत. यामध्ये दैनिकांसह वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. महामंडळाकडून अधिस्वीकृतधारकांच्या मूळ प्रतीची रेकॉर्डला नोंद करून वर्तमानपत्राचे ओळखपत्र, आधार कार्डची प्रत सोबत घेऊन त्याची खात्री पटल्यानंतरच मोफत प्रवासाचे कार्ड वितरित केले जाते. एप्रिल २०२१ नंतर स्मार्ट कार्ड बंद करण्यात आले. त्याऐवजी साधे ओळखपत्र देण्यात आले. तरीही नाशिक शहरासह निफाड, लासलगाव, सिन्नर, येवला, कोपरगाव भागात तोतया पत्रकारांकडून बनावट स्मार्ट कार्डद्वारे विनातिकीट प्रवास केला जात आहे. वाहकांनी हे कार्ड जप्त करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याशी वाद घालण्याचे प्रसंग घडत आहेत. लासलगाव आगारातील एका वाहकाने १० हून अधिक बनावट स्मार्ट कार्डचे फोटो काढले असता संबंधितांनी तिकीट काढून प्रवास केला. मात्र, वाहकालाच तुझी बदलीच करतो, अशी धमकीदेखील दिली.

### अजब.. सर्वच स्मार्ट कार्डवर श्रीरामपूर आगाराचा कोड

विशेष बाब म्हणजे या सर्वच बनावट स्मार्ट कार्डांवर परिवहन महामंडळाच्या श्रीरामपूर आगाराचा एसएमपीआर ५१०००४३२ असा असून आयडी क्रमांक १६०००००० ०७१४ देखील असा आहे. याच एका क्रमांकाची नोंद सर्वत्र करत हे बनावट कार्ड तयार करण्यात आले आहेत.

## धारावीत गॅस सिलेंडरच्या ट्रकला भीषण आग



**मुंबई :** धारावीमध्ये बस डेपोजवळ गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या एका ट्रकला आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत १२ ते १३ सिलिंडरचे एकापाठोपाठ स्फोट झाल्याची माहिती आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत अद्याप कुणी जखमी झाल्याचे वृत्त समोर आले नाही. या घटनेमुळे परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.

### अनेक दुचाकी जळून खाक झाल्याची माहिती

मिळालेल्या माहितीनुसार, धारावीच्या पीएमजीपी कॉलनी परिसरामध्ये रस्त्यावर पार्क केलेल्या सिलेंडरच्या गाडीत अचानक आग लागली. यानंतर गाडीत असलेल्या १२ ते १३ सिलेंडरचे एकामागे एक स्फोट झाले. मोठी वर्दळ असलेल्या बस डेपोजवळ ही घटना घडली. सिलेंडरच्या स्फोटामुळे परिसर दणाणून गेला होता. या घटनेत ट्रकच्या आसपास असणाऱ्या ५ ते १० दुचाकी जळून खाक झाल्या. ही आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजू शकले नाही. अग्निशामक दलाच्या ८ ते १० गाड्या आणि पाण्याचे १० टँकर घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले असून सध्या कुलिंगचे काम सुरू आहे. यादरम्यान, पोलिसांकडूनही सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काळजी घेतली गेली. सिलिंडर ब्लास्टनंतर ट्रकला आग लागल्याने हवेत धुराचे लोटही पसरले होते.

## सीईटी परीक्षेत मोठा घोटाळा उघड

### मार्क वाढवून देण्यासाठी २२ लाखांची देवाणघेवाण, चौघे अटकेत

**उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची विधान परिषदेत माहिती विद्यार्थ्यांना सतर्कतेचे आवाहन**

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :
राज्यातील सीईटी परीक्षेत मोठा घोटाळा उघडकीस आला असून एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी तब्बल २२ लाख रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, गुन्हेगार उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या परराज्यातील असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सीईटी कक्षातर्फे एमबीए, एमएमएस आणि अभियांत्रिकीसह विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात आली होती. २०२५-२६-या शैक्षणिक वर्षासाठी इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले होते. अर्ज प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हेल्प डेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

दरम्यान, दोन विद्यार्थ्यांनी स्पॅम कॉलद्वारे मार्क वाढवून देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याची तक्रार दिली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ समिती नेमून चौकशीचे आदेश दिले. चौकशी अहवालात आर्थिक व्यवहाराचे पुरावे समोर आले असून या रॅकेटचा फैलाव देशभरात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी प्रत्येकी २२ लाख रुपये घेण्यात आल्याचे उघड झाले आहे. आरोपींनी विविध विद्यार्थ्यांना फोन करून मार्क वाढवण्याचे आमिष दाखवले. याप्रकरणी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या रॅकेटचा अधिक तपास सुरू असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी अशा फसवणूक करणाऱ्या टोळ्यांपासून सावध राहावे आणि अशा भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहनही पाटील यांनी यावेळी केले. सीईटी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आणि अशा प्रकारचे प्रकार रोखण्यासाठी सीईटी कक्षाला योग्य ती दक्षता घेण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

# मराठी असल्याने असोसिएशनचे सदस्यत्व नाकारले, ठाकरे गट आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : मराठी माणसांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणाऱ्या गिरगावात मराठी असल्याने पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व नाकारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे ठाकरे गटाने आक्रमक होत जाब विचारला आहे. गिरगावात मराठी असल्याने पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व नाकारले, ठाकरे गट आक्रमक मराठी असल्याने गिरगावात पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व न दिल्याने ठाकरे गटाने संस्थेच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला आहे. या असोसिएशनचे मुंबईत १७ हजार सभासद असून संघटनेत मराठी माणसांना डावलल्याचे उघडकीस आले आहे. या असोसिएशनचे सभासद होण्यासाठीचे अर्जही गुजराती आणि इंग्रजी भाषेत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या शिवसैनिकांनी येथे जोरदार हंगामा केला आहे. या प्रकरणात मराठी असल्यामुळे



डायमंड असोसिएशनचे सभासत्व सभासत्व न दिल्याने ठाकरे गट आक्रमक होऊन डायमंड असोसिएशनच्या कार्यालयात जाऊन बोर्डाला काळ फासले आहे. दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्न गिरगाव ऑपेरा हाऊस या असोसिएशनचे मुंबईत १७ हजार सभासद आहेत. आता नव्याने आठशे जणांना सभासद केले आहे. त्यात एकही मराठी माणसाला सभासद केले नसल्याचे उघडकीस आले आहे. या असोसिएशनच्या काही सभासदांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना केवळ ते मराठी असल्याने सभासत्व देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे याचा जाब विचारण्यासाठी शिवसैनिकांनी मंगळवारी गिरगावातील दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्नच्या कार्यालयात जाऊन जोरदार घोषणाबाजी केली आहे.

### मराठी माणसांना डावलण्याची हिंमत होतेच कशी ?

दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्न गिरगाव ऑपेरा हाऊस या असोसिएशनच्या कर्मचाऱ्यांना आता निवडणूका नाहीत असा बचाव केला. त्यावेळी ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी जोरदार हंगामा केला. निवडणूका गेल्या खड्ड्यात आधी मराठी माणसांना सभासद का केले नाही ते सांगा. आणि सभासत्व मिळण्यासाठी नवीन सभासद अर्ज बनवला होता तो सुद्धा इंग्लिश आणि गुजरातीमध्ये बनवला आहे. यामुळे ठाकरे गटाने आक्रमक होत.

## शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला भर रस्त्यात चोपलं

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

कल्याण पश्चिमे येथे शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवकला शिवसेना महिला कार्यकर्तीने भर रस्त्यात मारहाण केल्याची घटना घडली आहे. .या मारहाणीत माजी नगरसेवकाच्या डोळ्याला दुखापत झाली आहे. नेमकी ही मारहाण का करण्यात आली?



कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे सध्या महाराष्ट्रामध्ये मोठा वाद पेटला आहे. मात्र आता ही घटना ताजी असतानाच दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला शिवसेनेच्या महिला कार्यकर्तीने भर रस्त्यावर चांगलाच चोप दिल्याची घटना घडली आहे. रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमावरून या दोघांमध्ये वाद झाला असल्याचं म्हटलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पश्चिमेमध्ये ही घटना घडली आहे. राणी कपोते असं या महिलेचं नाव आहे. कल्याण पश्चिमेतील मोहिंदर सिंग काबूल सिंग परिसरात एका रस्त्याच्या कामाचा शुभारंभ होता. हा कार्यक्रम रविवारी संध्याकाळी पार पडला. या कार्यक्रमाला कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर हे काही कामानिमित्त बाहेर असल्याने त्यांचे सुपुत्र वैभव भोईर यांच्या उपस्थितीत पार पडला.

### रस्त्याचा कामाच्या श्रेयवादावरून वाद सुरु झाला

त्याठिकाणी माजी नगरसेवक मोहन उगले यांच्यासह महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या. त्याठिकाणी कार्यक्रमासाठी शिवसेना महिला कार्यकर्त्या राणी कपोतेही पोहचल्या होत्या. यावेळी रस्त्याचा कामाच्या श्रेयवादावरून वाद सुरु झाला. कामाचा पाठपुरावा आपण केला, असा दावा राणी कपोते यांनी केली होता. त्यानंतर या ठिकाणी दोन्ही गटामध्ये जोरदार गोंधळ झाला. त्यावर माजी नगरसेवक उगले यांनी या कामाचा पाठपुरावा मी केला असल्याचा दावा केला. यामुळे काही काळ त्याठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. आणि हा वाद अखेर टोकाला केला.

अहिल्याबाई चौकात राणी कपोते आणि मोहन उगले यांच्यात पुन्हा या विषयावरून वाद निर्माण झाला.

तसेच यावेळी राणी कपोते यांनी तू मला शिव्या का देतो ? माझ्यासोबत गैरवर्तन का केलं ? असं म्हणत उगले यांना थेट मारहाण करायला सुरुवात केली. भर रस्त्यात सर्वांसमोर त्यांनी उगले यांना चोप दिला. यात उगले यांच्या डोळ्याला दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

राणी कपोते यांनी उगले यांच्यावर गैरवर्तन केल्याचा आरोप केला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## आयपीएलमध्ये मोठ्या प्रमाणावर बेटिंग सुरू अंबादास दानवे यांचा गंभीर आरोप

**मुंबई :** मुंबई पोलिसांच्या मदतीने आयपीएल क्रिकेट सामन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेटिंग सुरू असल्याचा गंभीर आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या संदर्भातील संभाषण असलेला पेनड्राइव्ह त्यांनी थेट सभापतींकडे सादर केला. त्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. दानवे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, बेटिंग रॅकेटमध्ये मेहुल जैन, कमलेश जैन आणि हिरेन जैन यांचा समावेश असून, या रॅकेटमध्ये पाकिस्तानी खेळाडूंचाही वापर केला जात असल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये 'लोटस २४' या ॲपच्या माध्यमातून हे बेटिंग झालं असून, आता ही मंडळी मुंबईत आयपीएलसाठी दाखल झाली आहेत, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

### राज्याच्या विभागांमध्ये घोटाळ्यांचा पाढा

आपल्या भाषणात दानवे यांनी परिवहन, सिडको, महसूल, आरोग्य विभागांतील घोटाळ्यांचा पाढा वाचला. अनेक मंत्र्यांवर थेट भ्रष्टाचाराचे आरोप करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. राज्याची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली आहे, असा आरोप करत दानवे यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर तीव्र निषेध नोंदवला.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कविता सादर करत दानवे म्हणाले छोटे मनसे कोई बड़ा नहीं हो सकता, टूटे मनसे कोई खड़ा होई न सकता. या ओळी सांगून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर निशाणा साधला. दानवे म्हणाले, राज्य सरकारने गेल्या दोन वर्षांपासून 'क्राईम इन महाराष्ट्र' अहवाल प्रसिद्ध केलेला नाही. राज्यात एकूण ५६४ विविध गुन्हे दाखल झाले आहेत. दंगली, बलात्कार, विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नागपूर, पुणे, संभाजीनगर याठिकाणी बलात्काराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दररोज २२ बलात्कार आणि ४५ विनयभंगाच्या घटना घडत आहेत. कायद्याचा धाकच राहिलेला नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

सरकारने महिलांच्या सुरक्षेसाठी सुरु केलेल्या मिशन शक्ती अभियानात केवळ २२ टक्केच निधी खर्च झाला आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे सांगत दानवे यांनी सरकारच्या महिला सुरक्षाविषयक दाव्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### सरकारवर सर्व बाजूंनी हल्लाबोल

अंबादास दानवे यांच्या या आरोपांमुळे सभागृहात एकच खळबळ उडाली. त्यांनी बेटिंग रॅकेटपासून ते गुन्हेगारी वाढ, महिला अत्याचार आणि विभागीय घोटाळे अशा सर्व मुद्द्यांवरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. आता या आरोपांची दखल सरकार घेते की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कायदा आणि सुव्यस्थेवरून सरकार लक्ष्य

### जयंत पाटील, नाना पटोले यांची टीका

**मुंबई:** राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचस्थिती बिघडली असून सरकार राज्यात शांतता राखण्यात अपयशी ठरले आहे. सत्तेवर येण्यापूर्वी दिलेले एकही आश्वासन सरकारने पूर्ण केलेले नाही. १०० दिवसांत राज्यातील गुन्हेगारी वाढली असून सरकारमध्ये बसलेलेच प्रक्षोभक विधाने करून राज्यातील परिस्थिती बिघडवत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी वेळीच सावध होऊन महाराष्ट्राला सावरण्याचे काम करावे, अशा शब्दात विरोधी पक्षाने सोमवारी कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून फडणवीस सरकारला लक्ष्य केले. आज विधानसभेत विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना काँग्रेसच्या जयंत पाटील आणि काँग्रेसच्या नाना पटोले यांनी नागपूर दंगल, महिला अत्याचार, गुन्ह्यांची वाढती संख्या यावरून सरकारला धारेवर धरले. राज्य सरकारने १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण केला. १०० दिवसांचे व्हिजन डॉक्युमेंट मांडू असे सांगणाऱ्या सरकारला विकासाची दिशा मांडण्यात अपयश आले आहे. या १०० दिवसात राज्यात हत्याकांड, महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार, ड्रग्ज, वाचाळवीर, दंगली हेच दिसले, अशी बोचरी टीका विरोधकांनी केली.

राज्यात २०२४ मध्ये १२ दंगली घडल्या. देशातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात घडलेल्या दंगली सगळ्यात जास्त आहेत. नागपूरची दंगल पूर्वनियोजित कट होता, असे सरकार म्हणते. दंगल हा पूर्वनियोजित कट होता तर मग पोलीस खाते काय करत होते ? सरकारमध्ये बसलेल्यांनी उदात्तीकरण करण्याची भूमिका घेऊ नये.

समाजजीवन उद्ध्वस्त झाले तर दावोसमधून सामंजस्य कराराच्या माध्यमातून आलेले १५ लाख कोटी दुसऱ्या राज्यात जातील, असा इशारा पाटील यांनी यावेळी दिला. मागील तीन वर्षांत छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यांनी-ज्यांनीअवमान केला आहे त्यांच्याविरोधात सरकारने गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी जयंत पाटील यांनी वांद्रे येथील सरकारी जमिनीवर सुरु असलेल्या बेकायदा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, एमआयडीसीसी आणि मुंबईतील महत्वाच्या रस्ते प्रकल्पात सुरु असलेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडला.

### यांच्या घरावर बुलडोझर चालवणार का ?

कुणाल कामराने कविता केली तर त्याच्याविरोधात उद्रेक केला. मग शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह बोलणाऱ्या कोरटकर, सोलापूरकर यांच्याविरोधात हा उद्रेक का दिसला नाही ? त्यांना अजून का अटक झाली नाही ? कामरा प्रमाणे त्यांच्या घरावरही सरकार बुलडोझर चालवणार का ? असे सवाल नाना पटोले यांनी यावेळी केले.

## तुम्ही बाळासाहेबांचा अपमान नाही केला का? जया बच्चन यांच्याकडून कामराचे समर्थन अन शिंदेंना सवाल



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या टीकेमुळे निर्माण झालेल्या वादावर जया बच्चन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी कामराला पाठिंबा दिला असून एकनाथ शिंदेंवरही काही सवाल उपस्थित केले आहेत.

तुम्ही बाळासाहेबांचा अपमान नाही केला का? जया बच्चन यांच्याकडून कामराचे समर्थन अन् थेट एकनाथ शिंदेंना सवाल - स्टँड-अप कॉमेडिअन कुणाल कामराने त्याच्या गाण्यातून एकनाथ शिंदे यांच्यावर एक टीका केली आहे. जाणूनबुजून अपमानित करण्याचा आणि मोठ्या नेत्यांना बदनाम करण्याचं काम करू नये. त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. कामराने माफी मागितली पाहिजे अशी मागणीही त्याच्याकडून केली जात आहे. आता कुणाल कामरा यांनी एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टिप्पणी केल्यानंतर एक मोठा वाद निर्माण झाला आहे. मात्र आता या वादावर जया बच्चन यांनी देखील प्रतिक्रिया दिली असून जया बच्चन यांनी कामराला पाठिंबा दिला आहे. इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांप्रमाणे आता अभिनेत्री आणि खासदार जया बच्चन यांनीही या विषयावर उघडपणे आपले मत व्यक्त केले आहे. तसेच त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दलही बोलल्या आहेत. कुणाल कामराने हॅबिटॅट कॉमेडी क्लबवर त्यांच्या लाईव्ह शो दरम्यान शिवसेना युवा शाखेच्या सदस्यांनी हल्ला केला. शो बंद करण्यात आला आणि सेटची तोडफोडही करण्यात आली. आता या प्रकरणात केलेल्या कारवाईत आरोपींना अटक करण्यात आली आहे. जया बच्चन यांनी या मुद्द्यावर संसदेबाहेर माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, जर बोलण्यावर बंदी असेल तर तुमचे काय होईल? तसही तुमची परिस्थिती वाईट आहे. जर तुमच्यावर बंधने आहेत. तुम्हाला फक्त काही विशिष्ट विषयांवर बोलण्यास सांगितलं जात असेल आणि काही प्रश्न विचारू नका असंही सांगितलं जात असेल, तर यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य कुठे आहे? जया बच्चन पुढे म्हणाल्या, एखाद्यावर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य तेव्हाच असते जेव्हा काही गोंधल होतो जसं की विरोधकांना मारहाण करणे, महिलांसोबत वाईट वागणे, लोकांची हत्या करणे, अजून काय? तुम्ही (एकनाथ शिंदे) तुमचा मूळ पक्ष सोडून फक्त सत्तेसाठी दुसरा पक्ष स्थापन केला. हा बाळासाहेबांचा अपमान नाही का? असं म्हणत त्यांनी एकनाथ शिंदेंवरही प्रश्न उपस्थित केला आहे. खार पोलिस उपनिरीक्षक विजय यांच्या मते, कुणाल कामराच्या नया भारत स्पेशल चित्रपटाच्या रिलीजनंतर हा हल्ला झाला. विनोदी कलाकाराच्या वक्तव्याबद्दल आणि तोडफोडीबद्दल युवा विंगच्या सदस्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# प्रशांत कोरटकरला तेलंगणात भाजपच्या नेत्याने लपवले

### वडेट्टीवार यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या प्रशांत कोरटकला तेलंगणात भाजपच्या कार्यकर्त्यांनी लपवून ठेवल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्यांनी भाजपने यासंबंधी काँग्रेसवर केलेली टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. प्रशांत कोरटकर हे भाजपचे पाप असून, त्याचा काँग्रेसशी कोणताही संबंध नाही, असे ते यासंबंधी ठणकावत म्हणालेत. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानास्पद विधान करणारा तथा इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी देणारा प्रशांत कोरटकर तेलंगणात लपून बसला होता. कोल्हापूर पोलिसांनी सोमवारी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर आता त्याची कसून चौकशी केली जात आहे. तत्पूर्वी, भाजप आमदार परिणय फुके यांनी प्रशांत कोरटकर हा



तेलंगणातील एका काँग्रेस नेत्याच्या घरात लपून बसल्याचा खळबळजनक आरोप केला होता.

### तेलंगणात काँग्रेस नेत्याच्या घरी सापडला -फुके

प्रशांत कोरटकर हा तेलंगणातील एका काँग्रेस नेत्याच्या घरी लपून बसला होता. काँग्रेसच्या येथील काही नेत्यांनी त्याला तेलंगणात जाण्यास मदत केली. गडचिरोलीमार्गे त्याला कशा पद्धतीने तेंलगणात नेले ही माहिती ज्या लोकांनी दिली तेच लोक यात सहभागी आहेत. यावरून काँग्रेसचा त्याला वाचवण्याचा प्रयत्न होता असे स्पष्ट होते. पण आमचे सरकार त्याला कडक शासन करेल याची मी सर्वांना खात्री देतो. कोरटकर हा काँग्रेसशासित राज्यात एका काँग्रेस नेत्याच्या घरात सापडला. त्यामुळे यात कुणाचा हात होता हे चौकशीत पुढे येईल. त्याचे कॉल रेकॉर्डिंग तपासून आणखी काही सत्य बाहेर येतील. त्यातून महाराष्ट्र काँग्रेसचे नेते उघडे पडतील, असे परिणय फुके यांनी सांगितले.

### विजय वडेट्टीवारांनी फेटाळला आरोप

दुसरीकडे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी परिणय फुके यांनी केलेले आरोप जोरकसपणे फेटाळून लावले आहेत. काँग्रेसचा प्रशांत कोरटकरशी कोणताही संबंध नाही. कोरटकर हे भाजपचे पाप आहे. पोलिस त्याला जाऊन भेटले होते. तो कुठे लपला होता हे त्यांना ठावूक होते. पोलिसांनी चंद्रपुरात जावून त्याची सेवा केली. यावरून तो पोलिसांच्या बुरख्याखाली लपून वावरत होता हे स्पष्ट होते.

सरकारने कोरटकरला महाराष्ट्र द्रोही म्हणून घोषित करावे. त्याला तडीपार करावे. भाजपवाले स्वतःचे पाप लपवण्यासाठी काँग्रेसचे नाव घेत आहेत. तेलंगणातील भाजपच्या एका कार्यकर्त्याने त्याला आपल्या घरी आश्रय दिला होता. आम्ही तेथील नेत्यांशी व मंत्र्यांशी चर्चा केली आहे. काँग्रेसचा त्या लोकांशी दुरान्वयेही संबंध नाही, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

### कोरटकर याचे घर सरकार तोडणार का ?

प्रशांत कोरटकरला अटक झाली असली तरी त्याला खूप उशीर झाला. कोरटकरला अटक करायला इतके दिवस लागतात हे महाराष्ट्र पोलिसांचे अपयश आहे. प्रशांत कोरटकर हा महाराष्ट्रद्रोही आहे.

त्याचे तोंड न लपवता त्याला राज्यात आणा. आता प्रशांत कोरटकर याचे घर सरकार तोडणार का? या प्रश्नाचे उत्तर फक्त आता सरकारने द्यावे, असेही वडेट्टीवार या प्रकरणी म्हणाले होते.

# अजित पवार जे बोलले तेच मीं बोललो:कुणाल कामरा



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी एका निवेदनाद्वारे आपण उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जे म्हटले त्याचा पुनरुच्चार केल्याचा दावा करत शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. मला या जमावाची भीती वाटत नाही. त्यामुळे मी लपून बसत प्रकरण शांत होण्याची वाट पाहणार नाही. मी काहीही चुकीचे बोललो नाही. अजित पवार (पहिले मुख्यमंत्री) यापूर्वी जे म्हणाले होते तेच मी म्हणालो, असे त्याने म्हटले आहे.

### मुंबई पोलिस पोहोचले कामराच्या घरी

मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला समन्स बजावून आज सकाळी ११ वाजेपर्यंत चौकशीसाठी हजर राहण्यास बजावले होते. पण तो आला नाही. परिणामी, पोलिसांनी मुंबई स्थित त्याच्या घरी जावून त्याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण तो तिथे सापडला नाही. या घरी कुणाल कामराचे आई-वडीलसहतात.

### वादानंतर २४ तासांनी भूमिका स्पष्ट

कुणाल कामराने आपल्या कवितेवरून तोडफोड झाल्यानंतर जवळपास २४ तासांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते आपल्या ४ पानी निवेदनात म्हणाले, मी माफी मागणार नाही. अजित पवार (प्रथम उपमुख्यमंत्री) हे एकनाथ शिंदे (द्वितीय उपमुख्यमंत्री) यांच्याविषयी जे म्हणाले होते, तेच मी म्हणालो. मी या जमावाला घाबरत नाही आणि मी पलंगाखाली लपून बसून प्रकरण शांत होण्याची वाटही पाहणार नाही.

ते म्हणाले, मनोजरंजनाचा कार्यक्रम ज्या ठिकाणी झाला (शूटिंगचे स्थळ) ते फक्त एक व्यासपीठ आहे. सर्व प्रकारच्या कार्यक्रमांची ती जागा आहे. हॅबिटेट (किंवा इतर कोणतेही ठिकाण) माझ्या विनोदासाठी जबाबदार नाही. मी काय बोलतो किंवा करतो याचा त्यांच्याशी कोणताही संबंध नाही. त्यांचे माझ्यावर नियंत्रणही नाही. तसेच कोणत्याही राजकीय पक्षाचा यात संबंधही नाही. विनोदी कलाकारांच्या शब्दांसाठी अशा सेटवर हल्ला करणे म्हणजे चिकन दिले नाही म्हणून तुम्ही टोमॅटोचा ट्रक पलटी केल्यासारखी निरर्थक गोष्ट आहे. कुणाल कामराने आपल्याला धडा शिकवण्याची धमकी देणाऱ्या नेत्यांवरही बेधडक मत व्यक्त केले. तो म्हणाला, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर केवळ शक्तिशाली आणि श्रीमंत लोकांची खुशामत करण्यासाठी केला जाऊ नये.

महासागर
बुधवार, दि. 26 मार्च 2025
अमरावती
पान 3

# नागरवाडी गावाला जिल्ह्यातील पहिले 'सौरग्राम' चा बहुमान

**मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि बापूसाहेब देशमुख यांच्याहस्ते लोकार्पण**

### जिल्ह्यातील पहिले आणि विदर्भातील दुसरे सौरग्राम



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 )-** प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत जिल्ह्यातील पहिले 'सौरग्राम' होण्याचा बहुमान चांदुरबाजार तालुक्यातील नागरवाडी गावाला मिळाला असून छतावर सौर प्रकल्प बसवून वीज निर्मितीला सुरूवात केल्यामुळे पुढील काळातील गावाचे विजेचे बिल शुन्य होणार असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.

स्वतंत्र गावाचा दर्जा असलेले संत श्री गाडगे महाराज संस्थान व आश्रम शाळा नागरवाडी गावातील सर्व वीज जोडण्या सौर प्रकल्पाला जोडल्यामुळे नागरवाडी हे पहिले सौरग्राम ठरले आहे. यावेळी या संस्थानचे संस्थापक बापूसाहेब देशमुख,अधीक्षक अभियंता दीपक देवहाते,कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट,उपकार्यकारी अभियंता दिनेश भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता कुलकर्णी म्हणाले की,नागरवाडी गावाने पुढाकार घेत छतावरील सौर प्रकल्पाच्या माध्यमातून वापरासाठी लागणारी वीज स्वतः निर्माण करण्याला सुरूवात केली आहे. जिल्ह्यातील इतर गावांनीही नागरवाडी गावाचा आदर्श घेत प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेचा लाभ घेत आपल्या छतावर सौर प्रकल्प बसवून वीजनिर्मिती करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यकारी अभियंता विजय कुमार कासट म्हणाले की , नागरवाडी गाव हे 'सौरग्राम' म्हणून उदयास आलेले वर्धा जिल्ह्यातील चिचघाट नंतर विदर्भातील दुसरे गाव आहे. यासाठी बापूसाहेब यांचा पुढाकार आणि मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगीतले.

नागरवाडीला 'सौरग्राम' चा बहुमान मिळवून देण्यासाठी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट उपकार्यकारी अभियंता दिनेश भागवत,सहाय्यक अभियंते प्रसाद पांडे आणि चंद्रशेखर कुंभारकर यांनी मोलाची भूमिका पार पाडली.

### 17.5 किलोवॅटची सौर यंत्रणा

चांदूर बाजार पासून 20 किमी अंतरावर असणारे संत श्री गाडगे महाराज संस्थान नागरवाडी या गावाला स्वतंत्र गावाचा दर्जा आहे. आश्रम शाळा,वस्तीगृह आणि एकुण 10 शिक्षक सदनिकाचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेतील प्रति किलोवॅट 30 हजार रूपये अनुदानाचा लाभ घेत याठिकाणी 10 शिक्षक सदनिकेच्या छतावर प्रति 1 किलोवॅटचे सौर प्रकल्प बसविण्यात आले.त्याचबरोबर संस्थेसाठी 7.5 किलोवॅटचे स्वतंत्र सौर प्रकल्प (विना अनुदान)बसविण्यात आले आहे.त्यामुळे एकून 17.5 किलोवॅटची सौर यंत्रणा बसविण्यात आल्यामुळे महिन्याला सरासरी 2000 हजार युनिटची वीज निर्मिती होणार आहे व वीज देयकात तेवढीच बचत होणार आहे.

# माझ्या मते ही आत्महत्या नसून या सर्वांव्दारे केली गेलेली सुनियोजीत हत्याच आहे!

**प्रा.संतोष गोरे यांची सुसाईड नोट आली समोर / त्या 34 लोकांमध्ये 10 महिलांचे नाव सामील**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 )-** काल सोमवारी (24) धामणगाव रेल्वे स्थानकाजवळ मालगाडीसमोर येऊन आत्महत्या करणारे प्रा. संतोष भास्करराव गोरे यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेली सुसाईड नोट अखेर समोर आली आहे. यासोबतच या सुसाईड नोटमध्ये नमूद केलेल्या 34 जणांची नावेही समोर आली आहेत. गोरे यांनी या सुसाईट नोटमध्ये सांगितले की, 'माझ्या मते ही आत्महत्या नसून या सर्वांव्दारे केली गेलेली सुनियोजित हत्याच आहे!, त्यांनी उल्लेख केलेल्या या 34 लोकांमध्ये 10 महिलांचे नाव आहे.

प्रा.संतोष गोरे यांनी असेही लिहिले होते की त्यांच्या मृत्यूनंतर ते त्यांची सर्व जंगम आणि स्थावर मालमत्ता त्यांची पत्नी संमोहिनी उर्फ जिज्ञासा गोरे आणि मुलगी मीनाक्षी गोरे यांना देण्यात यावी. सोमवारी सकाळी यवतमाळ येथील रहिवासी प्रा. धामणगाव रेल्वे स्थानकाजवळ संतोष गोरे यांचा मृतदेह छिन्न विछिन्न अवस्थेत आढळला. त्यांच्याकडून एका पानाच्या सुसाईड नोटची माहिती देखील मिळाली आणि असे उघड झाले की सुसाईड नोटमध्ये एकूण 34 नावे नमूद करण्यात आली होती, ज्यामध्ये बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या काही पुरुष आणि महिला प्राध्यापकांसह काही उच्चपदस्थ लोकांची नावे होती. त्यामुळे यवतमाळहून धामणगावला पोहोचलेल्या संतोष गोरे यांच्या कुटुंबियांना सुसाईड नोटमध्ये नाव असलेल्या लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल होईपर्यंत, प्रा.संतोष गोरे यांनी त्यांचे शवविच्छेदन होऊ न देण्याची भूमिका घेतली होती. दुसरीकडे, बडनेरा जीआरपी द्वारे प्रा. संतोष गोरे यांच्या सुसाईड नोटबाबत कडक गुप्तता पाळली जात होती.

### 34 जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

दरम्यान, बडनेरा ग्रा.प.चे ठाणेदार मुंढे यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रा. संतोष गोरे यांनी त्यांच्या सुसाईड नोटमध्ये नमूद केलेल्या सर्व 34 जणांविरुद्ध बीएनएसच्या कलम 108 आणि 3(5) अंतर्गत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. ठाणेदार मुंडे यांच्या मते, आता या प्रकरणाची चौकशी केली जाईल. ज्या अंतर्गत बडनेरा जीआरपीचे एक पथक यवतमाळला गेले सर्वांचे जबाब नोंदवणार आहे.

### नोकरीचा राजीनामाही दिला होता

प्रा. संतोष गोरे यांच्याबद्दल वरिष्ठ महाविद्यालयातील एका महिला प्राध्यापिकेने प्राचार्यांकडे तक्रार केली होती. या तक्रारीनंतर प्रा. गोरे यांनी प्राचार्यांकडे आपला नोकरीचा राजीनामा दिल्याची माहिती आहे. मात्र प्राचार्यांनी त्यांची समजूत घातल्याचे समजते. महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समितीकडे शुक्रवारी त्यांचे प्रकरण चौकशीसाठी आले. शनिवारी समितीने संबंधित तक्रारदार आणि प्रा. गोरे यांना समक्ष बसवून समज देत प्रकरण सामंजस्याने मिटविले होते, अशी माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. त्यानंतर शनिवारी प्रा. गोरे जरा रिलॅक्स होवून घरी परत गेल्याचे सांगण्यात येते. या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य दुर्गेश कुंटे यांना विचारणा केली असता, प्रा. संतोष गोरे यांच्या आत्महत्या प्रकरणाशी महाविद्यालयाचा कुठलाही संबंध नसल्याचे सांगितले. महिला प्राध्यापकाच्या तक्रारीचा विषय संपला असताना त्यांनी हे पाऊल का उचलले हे पोलीस चौकशीत स्पष्ट होईल. मात्र त्यांनी असा टोकाचा निर्णय घ्यायला नको होता, असे प्राचार्य कुंटे म्हणाले.

### लॅपटॉपवर टाइप केली सुसाईड नोट

प्रा. गोरे रात्री 11.30 वाजता घरातून निघाले होते आणि दुचाकीने धामणगावला पोहोचले होते. दरम्यान, संतोष गोरे यांच्या सासूबाईंना प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहितीही समोर आली. त्यामुळे संतोष गोरे यांची पत्नी आणि मुलगी पुण्याला गेल्या होत्या आणि संतोष गोरे रविवारी संपूर्ण वेळ त्यांच्या घरीच होते. दरम्यान, रविवारीच त्याने त्याच्या वैयक्तिक लॅपटॉपवर त्याची सुसाईड नोट टाइप केली, ज्यामध्ये दोन-तीन दुरुस्त्या केल्यानंतर, संतोष गोरेने त्याची प्रिंटआउट घेतली आणि ती खिशात ठेवली आणि डिजिटल प्रत त्याच्या लॅपटॉपवर घरी सोडली. घरी बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजवरून हे उघड झाले.

### रात्री 2 वाजता झाले अंत्यसंस्कार

दरम्यान, सोमवारी सायंकाळी उशिरा धामणगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रा. संतोष गोरे यांचा मृतदेह त्यांच्या कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला, त्यानंतर रात्री धामणगावहून यवतमाळ येथे मृतदेह आणण्यात आला आणि त्यांची अंतिम यात्रा काढण्यात आली आणि रात्री 2 वाजताच्या सुमारास प्रा. संतोष गोरे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### असे आहेत सुसाईड नोटमधील नावे

प्रा. संतोष गोरे यांनी आपल्या मृत्युपुर्वी यवतमाळ च्या सिटी पोलीस स्टेशन व ग्रामीण पोलीस स्टेशन चे ठाणेदारच्या नावाने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये प्राचार्य दुर्गेश कुटे, सरिता देशमुख, धनंजय पांडे सर, कविता तातेड, विवेक धर्माधिकारी सर, ॲड. प्राजक्ता टिकले, रुचा गढीकर, वैशाली वाटकर, चंद्रशेखर कुडमेथे, प्रवीण बोंडे, दर्शन सायम, चंद्रकात तोलवानी, सतीश देशपांडे, कमलेश देशपांडे, सोमेश राठोड, मनीष वाघमारे, विनोद चव्हाण, महेश महाजन, संतोषकुमार गाजले, शैलेंद्र तेलंग, विराट धुढे, ज्ञानेश्वर गटकर, देवेंद्र भोयर, सौरभ वगारे, मनीषा मनीष गोरे उर्फ नंदा खंडेराव दुसाने, प्रसाद मनीष गोरे, ॲड. दरणे, निलेश मोरे, बंटी उर्फ निलेश (तुरकर , मीनाली सलाले, दिनेश दाणी, प्रदीप दुर्ग, आरती उर्फ आरु राठोड, वंशिका चिडाले यांच्या नावाचा समावेश आहे.

## घराच्या गच्चावरून 3 क्विंटल लोखंड चोरले

**अमरावती -** घराच्या गच्चावरून 3 क्विंटल लोखंड चोरून नेण्यात आले. ही घटना अचलपूर ठाण्याच्या हद्दीत 23 मार्च रोजी उघडकीस आली. अचलपुरातील विलायतपुरा येथील रहिवासी भाऊसाहेब राऊत (47) यांनी आपल्या हॉटेलचे बांधकाम झाल्यावर उरलेले 3 क्विंटल लोखंड राहत्या घराच्या गच्चावर ठेवले होते. सदर 10 हजार 500 रुपयांचे लोखंड अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही बाब लक्षात आल्यावर भाऊसाहेब राऊत यांनी अचलपूर ठाण्यात तक्रार दाखल केली.

# चाकुचा धाक दाखवून लुटणारी कुख्यात टोळी जेरबंद

**धामणगाव रेल्वे येथील स्टोन क्रशरच्या दिवानजी लुटल्याचे प्रकरण**



### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 25 ) -** चाकुचा धाक दाखवून लुटणारी कुख्यात टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने 25 मार्च रोजी नागपूरातून जेरबंद केली. कृष्णा तिवडी पंचेश्वर (28, रा. घर नं. 18, श्रमीक नगर, परसोडा, वर्धा रोड, नागपुर), खुशाल जगदीश शुल (19, रा. गडठी गोदाम, नागपुर) व शैलेश मुलबंद राठोड (27, रा. रामगाव ता. धामणगाव रेल्वे) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी धामणगाव रेल्वे येथील स्टोन क्रशरच्या दिवानजीला लुटले होते.

पोलिस सुत्रानुसार, 9 मार्च 2025 रोजी निलेश चाफले (रा, जुना धामणगाव रेल्वे) यांनी तक्रार दिली की, ते सकाळी 8 वाजता दरम्यान साई स्टोन क्रशनवरील मजुरांचे पगाराचे 2 लाख 88 हजार रुपये व साहित्य घेवून रामगाव रोडने जात असताना दोन अज्ञात ईसमांनी मागुन येऊन, चाकुचा धाक दाखविला आणि त्यांच्याजवळील रोख व साहित्य असा एकुण 3 लाख 2 हजाराचा मुद्देमाल हिसकावून नेला. अशा तक्रारीवरून दत्तापुर पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेचे गांभीर्य पाहता पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्या अनुषंगाने गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना, स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस चांदूर रेल्वे उपविभागात रेकॉर्डवरील आरोपी तपासत होते. दरम्यान गोपनिय माहिती मिळाली की, नागपुर ग्रामीण पोलीसांच्या रेकॉर्डवरील आरोपी कृष्णा पंचेश्वर (रा. जरीपटका, नागपुर) याने त्याच्या साथीदारासह सदरचा गुन्हा केला आहे. या माहितीवरून पोलिसांनी नागपुर येथे जाऊन आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

### जेलमधून सुटल्यानंतर केली जबरी चोरी

आरोपींविरुध्द नागपुरच्या एम.आय.डी.सी. पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात आरोपींना सन 2023 मध्ये नागपुर जेलमध्ये पाठविण्यात आले होते. त्यावेळी आरोपी कृष्णाची भेट बलात्काराचे गुन्ह्यात जेलमध्ये असलेल्या शैलेश राठोड याच्यासोबत झाली. तेव्हा त्यानी एकमेकांचे मोबाईल क्रमांक घेतले. त्यानंतर जेलमधुन सुटल्यावर कृष्णा व त्याचा मित्र खुशाल यांनी पैशांची गरज भागविण्यासाठी शैलेश राठोड (रा. रामनाव) याच्याकडुन टिप प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी कोंढाळी येथुन दुचाकी गाडी चोरली आणि त्यानंतर साई स्टोन क्रशरवरील दिवानजी यांना चाकूचा धाक दाखवून लुटले.

### 2 लाख 15 हजाराचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी तिन्ही आरोपींना ताब्यात घेवून विचारपुस केली त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. मुख्य आरोपी कृष्णा पंचेश्वर याच्या ताब्यातुन कोंढाळी येथून चोरी केलेली व गुन्ह्यात वापरलेली एम.एच. 31 डी.वाय. 2313 या क्रमांकाची दुचाकी एक दुचीकी जप्त करण्यात आला आहे. तर खुशाल थुलच्या ताब्यातून के.टी.एम. कंपनीची दुचाकी एम.एच. 31 एफ.एम. 1234 व शैलेश राठोडच्या ताब्यातुन एक मोबाईल असा एकुण 2 लाख 15 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना पुढील कार्यवाहीकरीता दत्तापुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## चांदूर रेल्वेतील 17 वर्षीय मुलगा बेपत्ता



**चांदूर रेल्वे -** चांदूर रेल्वे शहरातील शिवाजी नगर परिसरातील रहिवासी सैय्यद शकिल सैय्यद इसराईल (वय 17 वर्ष) हा बेपत्ता झाला आहे. सदर युवकाचे वर्णन रंग सावळा, केस काळे व उंची 5 फुट, डोळे काळे, चेहरा लांबट, शरीरबांधा सडपातळ व अंगात काळ्या रंगाचा पॅन्ट असुन पांढऱ्या रंगाचे शर्ट घातलेला आहे. सदर मुलगा मतिमंद असून रेल्वेने प्रवास करणेच्या सवयीचा आहे. तरी वरील वर्णनाचे अनोळखी मुलगा आढळून आल्यास त्यांनी पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे फोन नं. (07222) - 254036 या क्रमांकावर किंवा नजीकच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन स्थानिक पोलीस विभागातर्फे करण्यात आले आहे.

## आरटीई : प्रतीक्षा यादीतील प्रवेशांसाठी 1 एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**1679 विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती-** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील 25 टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता प्रवेशासाठी 1 एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. आरटीई प्रवेशासाठी यंदा जिल्ह्यात 235 शाळांमध्ये 2430 जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी 8841 अर्ज दाखल झाले होते. प्रवेशासाठी सोडतीद्वारे 2 हजार 396 विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर सोडतीद्वारे प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी 1600 विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला.त्यामुळे रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना 18 ते 24 मार्च या कालावधीत प्रवेश घेण्यास मुदत देण्यात आली होती. आतापर्यंत प्रतीक्षा यादीतील 79 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. नियमित आणि प्रतीक्षा यादी मिळून 1679 विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून प्रतीक्षा यादीतील प्रवेशांसाठी चार फेऱ्या राबवण्याचे नियोजन आहे. त्यामुळे 2 एप्रिलनंतर दुसऱ्या टप्प्यातील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी संधी दिली जाणार असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रिक्त जागांनुसारच एसएमएस पाठवण्यात येईल. मात्र, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई संकेतस्थळावरील अर्जाची स्थिती पाहणे आवश्यक आहे. पालकांनी प्रवेश मिळालेल्या पत्राची प्रत आणि आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून ऑनलाइन प्रवेश निश्चित करावा. प्रवेश निश्चित झाल्याची पावती घेऊन शाळेत जाऊन प्रवेश घेणे गरजेचे आहे.

# अमरावती विमानतळावर 30 मार्चला चाचणी उड्डाण

**एप्रिलपासून मुंबईसाठी नियमित सेवा सुरू | इंदूर-अमरावती मार्गावरून होणार टेस्ट फ्लाइट**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 ) -** अमरावतीमधील बेलोरा विमानतळावर 30 मार्च रोजी महत्त्वाची चाचणी उड्डाण (टेस्ट फ्लाइट) होणार असून, इंदूर-अमरावती मार्गावरील एटीआर-72 प्रकारचे विमान येथे उतरवण्यात येईल. यशस्वी लँडिंग आणि टेकऑफनंतर, विमानतळाच्या कार्यप्रणाली संबंधी आणखी काही तांत्रिक चाचण्या घेतल्या जातील. या सर्व प्रक्रियेनंतर, एप्रिल महिन्यात अमरावती-मुंबई हवाई सेवा अधिकृतपणे सुरू केली जाणार आहे.

बेलोरा विमानतळावर प्रवासी उड्डाणांसाठी विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या जात आहेत. 30 मार्च रोजी होणाऱ्या चाचणी उड्डाणानंतर आणखी दोन तांत्रिक चाचण्या केल्या जातील. यामध्ये पुढील गोष्टींची तपासणी केली जाईल. धावपट्टीची ताकद आणि लोड-बेअरिंग क्षमता, नेव्हिगेशन आणि कंट्रोल टॉवर कम्युनिकेशन सिस्टम, इमर्जन्सी रिस्पॉन्स आणि फायर सेफ्टी यंत्रणा, रनवे लाईट्स आणि अँटी-कोलायजन सिग्नल्सची तपासणी यासंबंधी भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (ढ्ढ) नियोजन केले असून, राज्य सरकारच्या सहकार्याने विमानतळावर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रयत्नांना यश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष प्रयत्नांमुळे अमरावती विमानतळाच्या हवाई उड्डाणांसाठी आवश्यक असलेला ष्ठत्नष्ट परवाना मंजूर झाला आहे. त्यामुळे आता अमरावती विमानतळावरून प्रवासी वाहतूक सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अलायन्स एअर एटीआर-72 विमानाद्वारे एप्रिल महिन्यात मुंबईसाठी नियमित सेवा सुरू होणार आहे.

### हवाई कॅलिब्रेशन चाचणी यशस्वी

भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या तज्ज्ञ टीमने 4 मार्च रोजी हवाई कॅलिब्रेशन चाचणी घेतली. यामध्ये रनवेवरील नेव्हिगेशन आणि लँडिंग सिस्टीमची तपासणी, विमानतळाच्या कंट्रोल टॉवर सिग्नल्सचे अचूक मापन, टेकऑफ आणि लँडिंग सेफ्टी पॅरामीटर्सची चाचणी ही सर्व चाचणी प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याने, आता अमरावती विमानतळावरून एप्रिल महिन्यात अधिकृत प्रवासी उड्डाणे सुरू होणार आहेत.

### एका उपनिरीक्षकांसह 25 अंमलदारांना प्रशिक्षण

प्रवासी उड्डाणांना सुरुवात करण्याच्या तयारीसह सुरक्षा व्यवस्थेतही मोठी सुधारणा करण्यात आली आहे. ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, 25 मार्चपासून विमानतळावर एका उपनिरीक्षकासह 25 पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये 10 पोलिस जमादार, 14 शिपाई, तसेच 10 महिला पोलिसांचा समावेश आहे. हे कर्मचारी 8-8 तासांच्या तीन शिफ्टमध्ये 24 तास तैनात असतील. त्यामुळे विमानतळाची सुरक्षा अधिक मजबूत झाली असून, हवाई सेवा सुरू होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या अंमलदारांना प्रशिक्षणही दिले जात आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, हॉटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# चांदूर रेल्वेच्या सेंट्रल बँकेत केवळ 4 फायर एक्सटिंग्विशर सिलेंडर

## 4 पैकी 1 सिलेंडर एक्सपायर | प्रत्यक्षात बँकेत 10 फायर एक्सटिंग्विशर सिलेंडरची आवश्यकता

### नगर परिषदच्या अहवालातून धक्कादायक माहिती उघड





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.25 )**- चांदूर रेल्वे शहरातील आठवडी बाजार स्थित सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या इमारतीला 15 मार्च रोजी सकाळी 11.45 वाजता शॉर्टसर्कीट होऊन भिषण आग लागली. या आगीमुळे बँकेतील लाखो रुपयांचे वस्तू, फर्निचर तसेच महत्वाची कागदपत्रे भस्मसात झाले होते. या घटनेनंतर स्थानिक नगर परिषदच्या अग्निशमन विभागाने सदर बँकेचा अहवाल तयार केला. आग लागली त्यादिवशी बँकेत केवळ 4 फायर एक्सटिंग्विशर सिलेंडर आढळले असुन त्यापैकी 1 एक्सपायर सुध्दा असल्याची धक्कादायक माहिती 24 मार्च रोजी दिलेल्या अहवालातून पुढे आली आहे. यावरून बँकेचे फायर ऑडीट सुध्दा झाले नसल्याची माहिती सुत्रांव्दारे मिळाली आहे. त्यामुळे सेंट्रल बँकेचे वरिष्ठ अधिकारी सदर प्रकरणाची चौकशी करणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

सेंट्रल बँकेच्या चांदूर रेल्वे येथील शाखेत शनिवारी नियमित कामकाज सुरू असतांना 15 मार्च रोजी सकाळी 11.45 वाजताच्या सुमारास सर्व्हर रूममधून धूर निघत असल्याचे निदर्शनास येताच पळापळ झाली. एका कर्मचाऱ्याने फायर एक्सटिंग्विशर सिलेंडरने आग विझविण्याचा प्रयत्न केला, मात्र आग विझली नाही. कारण सदर बँकेतील कर्मचाऱ्याला फायर एक्सटिंग्विशर सिलेंडरने आग विझविण्याचे प्रशिक्षण नसल्याचे दिसून आहे. कारण सर्वात आधी थोडी आग लागली असतांना ती आग आटोक्यात आणता आली असती तर ऐवढी मोठी घटना घडली नसती असे मत काही प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केले. परंतु काही वेळात सदर आगीने उग्र रूप धारण करीत अख्खी बँक जळून गेली. सुदैवाने यात बँकेतील लॉकर व कॅश सुरक्षित राहिली. या घटनेनंतर नगर परिषदच्या अग्निशमन विभागाने या घटनेचा अहवाल तयार केला असता त्यात महत्वपुर्ण बाबींचे निरिक्षक नोंदविले. या अहवालानुसार सदर सेंट्रल बँकेत 10 फायर एक्सटिंग्विशर सिलेंडरची आवश्यकता आहे. मात्र प्रत्यक्षात घटनेवेळी केवळ 4 फायर एक्सटिंग्विशर सिलेंडर आढळून आले. त्यापैकी सुध्दा एक सिलेंडर एक्सपायर असुन ते सन 2021 मध्ये भरल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे फायर यंत्रणेप्रति बँकेचा हलगर्जीपणा उघड झाला आहे. बँकेजवळ पुरेपुर फायर यंत्रणा व कर्मचाऱ्यांकडे चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण असते तर आग काही प्रमाणात का होईना मात्र आटोक्यात आली असती अशी चर्चा चांदूर रेल्वे परिसरात आहे. या अहवालानंतर आता बँक प्रशासन कोणती भुमिका घेते याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे.

### फायर अहवाल द्यायला विलंब ?

15 मार्च रोजी बँकेला आग लागली असता पोलीस प्रशासनाकडून 18 मार्च रोजी पत्राव्दारे या आगीच्या अहवालाची मागणी नगर परिषदेला करण्यात आली होती. केवळ साधा 6 - 7 ओळींचा अहवाल द्यायला नगर परिषदेला 6 दिवसांचा कालावधी लागला. या अहवालावर मुख्याधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करण्यास विलंब केल्याची माहिती सुत्रांव्दारे मिळाली आहे. सदर अहवाल द्यायला विलंब का ? याविषयी विविध चर्चांना ऊत आले आहे.

### बँक ग्राहकांच्या सेवेत रूजु

बँकेतील संपुर्ण काम झालेले असुन शुक्रवारपासून बँक ग्राहकांच्या सेवेत रूजु झाली आहे.

**-मंगेश भुरे शाखा प्रबंधक, चांदूर रेल्वे**

# अचलपुर-रासेगाव मार्गावर दुभाजकाचे काम कासवगतीने

## अपघातांचा धोका वाढला



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर,( दि.25 )** - अचलपुर ते रासेगाव मुख्य मार्गावर गोपी ढाब्याजवळ सुरू असलेले दुभाजकाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु आहे. ज्यामुळे वाहनचालकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अर्धवट काम आणि असुविधेमुळे वाहतुकीचा बोजवारा उडालेला आहे. याप्रकारामूळे अपघातांचा धोका अधिक वाढला आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांच्या मते, या मार्गाची स्थिती आधीच खराब होती. मात्र, अधुर्या दुभाजकामुळे वाहतूक व्यवस्था आणखीनच बिघडली आहे. अचलपुर आणि रासेगावदरम्यान मोठ्या प्रमाणावर वाहने ये-जा करतात, त्यामुळे या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. याठिकाणी अनेक वेळा अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत, मात्र प्रशासन आणि ठेकेदार कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. जर वेळीच उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी प्रशासनाकडे त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित ठेकेदारावर कारवाई करून दुभाजकाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी जनतेची मागणी आहे.अर्धवट दुभाजकामुळे अनेक वाहनचालकांना चुकीच्या दिशेने गाडी चालवावी लागत आहे, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता दुप्पट झाली आहे. प्रशासनाकडून रस्ते विकासासाठी निधी मंजूर होतो, तरीही अशा प्रकारची हलगर्जीपणा का केला जातो, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### प्रशासनाकडून हस्तक्षेपाची अपेक्षा

स्थानीय लोकांमध्ये संताप वाढत असून, जर लवकरच उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर नागरिक आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. प्रशासनाने त्वरित लक्ष घालून दुभाजकाचे काम प्राधान्याने पूर्ण करावे, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# गोलाई गावातील युवक संतोष नागरगोजे झाला पीएसआय



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.25 )** - संघर्ष आणि परिश्रमाच्या बळावर यशाचे उदाहरण घालून धारणी तालुक्यातील गोलाई या छोट्याशा गावातील संतोष देविदास नागरगोजे यांनी पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पद संपादन करत आपल्या आई-वडिलांचा आणि गावाचा गौरव केला आहे.

संतोष नागरगोजे यांचा प्रवास सोपा नव्हता. त्यांचे आई-वडील शोभा नागरगोजे आणि देविदास नागरगोजे यांनी शेतात मजुरीचे काम करून मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवला. खेडेगावात मोलमजुरी करून घर चालवणे कठीण झाले तेव्हा मुलांच्या शिक्षणात कोणतीही कमतरता पडू नये म्हणून ते पुण्याला गेले आणि रोजंदारीवर काम करू लागले. संतोषने स्वत: अर्धवेळ नोकरी करून शिक्षण सुरू ठेवले. पुस्तके विकत घेण्यापासून त्यांच्या गरजा पूर्ण करण्यापर्यंत त्यांनी स्वतऱ्च्या मेहनतीने त्या पूर्ण केल्या. आर्थिक चणचण असतानाही त्यांनी पीएसआय होण्याचे स्वप्न कधीच सोडले नाही आणि कठोर परिश्रमाने हे पद मिळवले.

### गावात आनंदाची लाट

संतोष नागरगोजे यांच्या या कामगिरीबद्दल गोलाई गावासह संपूर्ण धारणी तालुक्यात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण आहे. नागरिक त्याच्या संघर्ष आणि यशाबद्दल चर्चा करत आहेत आणि अभिनंदन करत आहेत. संतोषचे हे यश त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. ज्यांना अडचणींना घाबरून न जाता कठोर परिश्रम आणि समर्पणाने आपली स्वप्ने साकार करण्याची इच्छा आहे.

# वीट भट्टी कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## मुख्याध्यापिका विजया झाडे यांचा पुढाकार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.25 )** - अंजनगाव बारी आणि कोंडेश्वर परिसरात असलेल्या वीट भट्ट्यांवर रोजगारासाठी बाहेरगावाहून आलेल्या कामगारांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम नुकताच राबविण्यात आला. पार्डी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता.

अंजनगाव बारी आणि कोंडेश्वर परिसरात अनेक वीटभट्ट्या असून येथे मेळघाट, चिखलदरा तसेच मध्य प्रदेश, छत्तीसगड येथून आलेले अनेक मजूर कुटुंब रोजगारासाठी वास्तव्यास आहेत. त्यांची मुलेही सोबत असतात व स्थानिक शाळेत ते शिक्षण घेतात. अनेक मुले ही शाळाबाह्य आहेत. आर्थिक अडचणीमुळे हे कामगार त्यांना शिक्षणासाठी शाळेत टाकू शकत नाही. शाळाबाह्य मुलांनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणले जावे याकरिता जयश्री कराळे व सारिका इंगळे या दोन शिक्षिकांची नेमणूक करण्यात आली असून त्या या मुलांना गोळा करतात व कधी झाडाखाली तर कधी वीट भट्टी परिसरात असलेल्या मोकळ्या जागेत नेट लावून मुलांना शिकवितात. या शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या वर्गाला मुख्याध्यापिका विजया झाडे यांनी भेट देऊन वही, पेन, फुगे असे स्वखर्चाने वाटप केले. त्यामुळे हे विद्यार्थी आनंदित झाले होते. विजया झाडे या शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक क्षेत्रातही योगदान देतात. गरजूंना साहित्य वाटप, रक्तदान, देणगी अशा प्रकारचे उपक्रम त्या राबवित असतात.

## वरूडातील राष्ट्रसंत कॉलनीत घर फोडले

**अमरावती** - वरूडातील राष्ट्रसंत कॉलनी येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून 8 हजारांचा मुद्देमाल लांबविण्यात आला. ही घटना 23 मार्च रोजी उघडकीस आली. राष्ट्रसंत कॉलनी येथील रहिवासी विश्वनाथ रामटेके (66) हे मुलाला भेटायला नागपूरला गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांचे घर फोडून 8 हजार रुपयांचा मुद्देमाल लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर विश्वनाथ रामटेके यांनी वरूड ठाण्यात तक्रार दाखल केली.

# हर्षा पुसदकर यांना उत्कृष्ठ अंगणवाडी सेविका पूरस्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 )** - नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीअंतर्गत शिरपूर येथील अंगणवाडी केंद्रावर कार्यरत असलेल्या हर्षा धैर्यधर पुसदकर यांना जिल्हास्तरिय उत्कृष्ठ अंगणवाडी सेविका पूरस्काराने गौरविण्यात आले आहे. अमरावती येथे नूकत्याच पार पडलेल्या एका समारंभात जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते हर्षा पुसदकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांची प्रमुख उपस्थिती होती.



नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीअंतर्गत शिरपूर येथील अंगणवाडी केंद्रावर हर्षा पुसदकर या कार्यरत आहेत. अंगणवाडी केंद्रामार्फत राबविल्या जाणार्या शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच शासनाचे विविध उपक्रम अंगणवाडी केंद्रातर्फे उत्कृष्ठरीत्या पार पाडण्यात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल हर्षा पुसदकर यांची या जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. जिल्हा प्रशासनाचा एक महत्वपूर्ण पूरस्कार प्राप्त झाल्याबद्दल हर्षा धैर्यधर पुसदकर यांचे अमरावती जिल्हा श्री शैव गुरव हितकारिणी मंडळाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# साक्षरा शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतले पक्षी संवर्धनाचे धडे



## 1 हजार जलपात्राचे वितरण

## वन्यजीव दिनानिमित्त कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 )** - जागतिक चिमणी दिन आणि वन्यजीव दिनानिमित्त अमरावती वन विभाग आणि वॉर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी स्थानिक साक्षरा शाळेत उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील आणि युद्ध संस्थेचे अध्यक्ष नीलेश कांचनपुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जलपात्र वाटण्यात आले. कार्यक्रमात वन अधिकारी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पक्षी संवर्धनाविषयी माहिती दिली. वनसंपत्ती वाढविण्यात पक्ष्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. विद्यार्थ्यांना पक्ष्यांसाठी खाद्य बनविण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनात योगदान देण्याची जबाबदारी मोठ्या उत्साहाने समजून घेतली. उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील म्हणाले, निसर्गात मुक्तपणे विहार करणारे विविध पक्षी हे निसर्गाच्या संतुलित साखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. फळांच्या बिया त्यांच्या विष्ठेतून पसरून एक नैसर्गिक लागवड साखळी तयार करतात. निसर्गाने स्वत:सह सर्वांची काळजी घेतली, परंतु मानवी इच्छांमुळे ही साखळी खंडित झाली. ही साखळी टिकवून ठेवण्यात पक्षी महत्त्वाची भूमिका बजावतात. यावेळी वन संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि पक्षी संवर्धनाचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी सहाय्यक उपवनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई, प्रा. कविता केवतकर, मानद वन्यजीव संरक्षक डॉ. जयंत वडतकर, हेल्प फाउंडेशनचे रत्नदीप वानखडे, सर्पमित्र राघवेंद्र नांदे यांच्यासह साक्षरा शाळेचे सर्व शिक्षक आणि 350 हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

### स्वत:पासून सुरुवात करा

जंगले आणि पक्ष्यांचे संवर्धन करूनच आपण निसर्गात संतुलन साधू शकतो. उन्हाळ्यात, नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडल्यामुळे पक्ष्यांना पाणी शोधण्यात अडचणी येतात. तहानलेले पक्षी पाण्याच्या शोधात शहरात येतात. अशा वेळी पक्ष्यांना पाणी उपलब्ध करून दिले तर डिहायड्रेशनमुळे होणारे त्यांचे मृत्यू रोखणे शक्य आहे.

**प्रा. कविता केवतकर, साक्षारा स्कूल**

### औद्योगिकीकरण पर्यावरणासाठी धोकादायक

वाढत्या शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जंगले नष्ट होत आहेत. परिणामी झाडे, पक्षी, प्राणी आणि मानव यांचे जीवन धोक्यात आले आहे. जंगले नष्ट होत आहेत, पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. जागतिक तापमानात वाढ झाल्यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या उद्भवली. याशिवाय पक्ष्यांची संख्याही झपाट्याने कमी झाली आहे. पक्षी आणि प्राण्यांना आवश्यक असलेला निवारा किंवा अन्न मिळत नाहीये. म्हणूनच, पाण्याचे भांडे किंवा विविध पाण्याची उपकरणे उपलब्ध करून देण्याबरोबरच विज्ञानाचा वापर करून पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटे कशी तयार करावीत याचा विचार करणे आवश्यक आहे. समाजातील लोकांना याबद्दल जागरूक करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत. जर समाजातील प्रत्येक व्यक्तीने हे लक्षात ठेवले आणि त्यानुसार कृती केली तर आपण पर्यावरणाचा होणारा र्‍हास निश्चितच थांबवू शकतो.

**धैर्यशील पाटील, उपवनसंरक्षक**

# अंजनगाव बारीत विजेच्या लंपडावाने नागरिक त्रस्त

## महावितरणचा ढिसाळ कारभार कारणीभूत | उद्योग, व्यवसायांवर विपरित परिणाम

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.25 )** - अंजनगाव बारी येथे ऐन उन्हाळ्यात विजेच्या लपंडावाने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यासाठी महाविरणचा ढिसाळ कारभार कारणीभूत ठरत आहे. महावितरणचे कनिष्ठ कनिष्ठ अभियंता आणि प्रशासनाचे या समस्येकडे पूर्णत- दुर्लक्ष असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. अनियमित वीज पूरवठ्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून उद्योग, व्यवसायांवरही त्याचा विपरित परिणाम झाला आहे.



सद्या सण, उत्सवांचे दिवस आहेत. अंजनगाव बारीत अनियमित वीज पूरवठा होत आहे. दिवसभरात अनेकदा वीजेची ये-जा सुरु असते. त्याचा फटका विजेवर चालणार्या उपकरणासह नागरिकांच्या व्यवसायाला बसत आहे. या प्रकारामुळे गावातील नागरिक हैराण झाले आहेत.

अंजनगाव बारीला गावठाणातील फिडरवरून विजेचा पुरवठा होतो. त्यावर अतिरिक्त भार आला कि विज बंद पडते. हे अनियमित वीज पूरवठ्यामागील मुख्य कारण आहे. अंजनगाव बारीला स्वतंत्र फिडरसाठी निधी प्राप्त झाला आहे. त्याला वनविभागासह स्थानिक प्रशासनाकडून अडसर होता, तोही दूर झाला आहे. मात्र हे काम अफापही पूर्ण करण्या तआलेले नाही. त्यामुळे अंजनगाव बारी येथे विजेची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अंजनगाव बारी फिडर जर वेगळे झाले या समस्येतून ग्रामस्थांची कायमची सुटका होउ शकेल. त्यासाठी लाखो रूपयाचा निधी अमरावती ग्रामीण परिमंडळात पडून असताना बडनेरा मेन सबस्टेशकडून हस्तांतरित करुन फिडरच्या कामाला सुरूवात करावी. यासाठी स्थानिक कनिष्ठ अभियंता पाठपुरावा केला आहे. त्यानंतरही वरिष्ठ अभियंता यांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष चालविले आहे. हे काम तात्काळ पूर्ण करुन अंजनगाव बारी वासीयांना या समस्येतून सोडवावे, अशी मागणी करण्या येत आहे.

अंजनगाव बारीत मागील काही दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडित होणे, विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे यासारखे प्रकार घडत आहेत. अलिकडच्या काही दिवसापासून नेहमी वीजपुरवठा खंडित असतो. विद्युत दाब अचानक कमी-जास्त होत असल्याने विजेवर चालणार्या उपकरणात बिघाड होत आहे.

पुरेसा वीजपुरवठा मिळत नसल्याने पीठ गिरणी बंद राहते, त्यामुळे महिला वर्गाला कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. वेळी अवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा विपरित परिणाम विजेवर चालणार्या उपकरणावर होत आहे. यामुळे अनेकांच्या टीव्ही, फ्रिज, कुलर, पंखा, झेराक्स मशीन, संगणकात बिघाड येत आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकार्यांचनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

खंडित वीज पुरवठयामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे स्थानिक महावितरण विभागाने तातडीने लक्ष घालून उपाययोजना करण्याची गरज आहे. मागणी दोन आठवड्यांपासून या प्रकरणांत वाढ झाली आहे.

**गजेंद्र बडनेरकर, स्थानिक नागरिक**

# गोवंश चोरी प्रकरणात तिघांना अटक, दोन फरार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.25 ) –** गोवंश जनावरे चोरी प्रकरणातील तीन आरोपींना अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 25 मार्च रोजी यश मिळाले. मनोहर चंद्रभान वाहने (60, रा. माधान, चांदुरबाजार), पवन मनोहर वाहने (26, रा. माधान, चांदुरबाजार) व गोवंश विकत घेणारा अश्पाक अहेमद बशीर अहमद (312, रा. चांदूर बाजार) अशी आरोपींची नावे आहेत. या गुन्ह्यातील दोन आरोपी फरार झाले असून, त्यांचा शोध पोलिस घेत आहे. अटक आरोपींनी पाच गुन्ह्याची कबुली दिली आहे.

दिलीप वासुदेव माहोरे (60, रा. अंतोरा, ता.जि.अमरावती) यांनी 18 फेब्रुवारी रोजी माहुली पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, रात्री दरम्यान त्यांच्या मालकीची 80 हजार रुपये किमंतीची बैलजोडी चोराने गोठ्यातून चोरून नेली. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी जनावरे चोरीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांना आळा घालुन टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार व त्यांचे पथक करीत होते. दरम्यान पोलिसांचे पथक रेकॉर्डवरील आरोपींचा शोध घेण्याकरिता मोर्शी उपविभागात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी पोलिसांना गोपनिय माहिती मिळाली की, मनोहर वाहने हा त्याच्या साथीदारासह जनावरांची चोरी करते. या माहितीवरून पोलिसांनी मनोहर चंद्रभान वाहने व पवन मनोहर वाहने यांना ताब्यात घेतले आणि गुन्ह्याबाबत विचारपुस केली. त्यावेळी त्यांनी अंतोरा परीसरातुन एक बैलजोडी चोरल्याची कबुली दिली. ती बैलजोडी आरोपी अश्पाक अहेमद बशीर अहमद याला विकल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी अश्पाक अहेमदलाही ताब्यात घेतले.



### आरोपींनी दिली पाच गुन्ह्यांची कबुली

आरोपींनी बैलजोडी चोरीची कबुली दिली असून, आरोपी वाहने यांनी गेल्या सहा महिन्यात मोझरी, डोमक, आष्टोली व करजगाव येथुन गोवंश चोरी केली आणि ते गोवंश फरार असणार्या आरोपींना विकले असल्याची माहिती दिली. आरोपींनी माहुली, शिरखेड, तिवसा, ब्राम्हणवाड़ा थडी व शिरजगाव कसबा येथील गुन्ह्यांची कबुली दिली असून,त्यांच्या ताब्यातून 3 हजाराची रोख जप्त करण्यात आली आहे.

# पाच वर्षापासून जीर्ण घरात भरते अंगणवाडी





## बालकांच्या जीवाशी खेळ

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.25 ) –** पथ्रोट नजीकच्या जवलापुर गट ग्रामपंचायत जवलापुर मधील पार्डी गावातील अंगणवाडी ची ईमारत मोडकळीस आल्याने कित्येक वर्षापासुन चिमुकली मुलं घरात भरत असलेल्या अंगणवाडीत गोळा होतात.

अंगणवाडी म्हणजे ग्रामीण बाल संगोपन केंद्र असून, महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते. अंगणवाडीमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण, आरोग्य तपासणी, लसीकरण, पोषण आहार, कुपोषणाच्या विरोधात काम, कुटुंब नियोजन यासारख्या महत्वपुर्ण कामांचा समावेश होत असताना दुर्दैवाने पार्डी गावातील अंगणवाडी मोडकळीस आल्याने घरात भरत असलेल्या अंगणवाडीत पोषण आहार घेऊन घराकडे जातात. प्रस्तुत प्रतिनिधी ने भेट दिली असता मिळालेल्या माहीतीनुसार 2014 मध्ये बांधलेली अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने 5 वर्षातच मोडकळीस आली. जिर्ण झालेल्या अंगणवाडीत पालक मुलांना पाठवत नसल्याने अंगणवाडी काही वर्ष शाळेत भरत होती. मात्र, पटसंख्या पुर्ण असल्याने कुठलीच खोली रिकामी नसल्याने सेविकांनी घरातच अंगणवाडी भरवणे सुरु केले. संबंधित विभागास वारंवार सुचित करुन नविन ईमारतीची मागणी किंवा दुरुस्तीची सुचना दिल्याची माहीती अंगणवाडी सेविकेने दिली.

### अंगणवाडीची इमारत धोकादायक

रयत संघटनेकडून प्रमुख राहुल कडु यांनी दिलेल्या माहीतीनुसार सन 2015 ला सदर अंगणवाडी तत्कालीन ग्रामपंचायत च्या सरपंच काळात ग्रामपंचायतने बांधली असुन सन 2019 ला मोडकळीस आल्याने संबंधित विभागास कळविले असता, अधिकार्यांनी चौकशी व पाहणी करुन अंगणवाडी वापरण्या योग्य नसल्याचा अहवाल दिला. आम्ही 2 वर्षापासुन मागणीचा पाठपुरावा केल्याने नविन ईमारत मंजुर करुन घेतली मात्र कंत्राटदार मिळत नसल्याने काम झाले नाही.

# अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी!

## आमदार उमेश यावलकर यांची विधानसभेत मागणी




**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.25 ) –** तालुक्यातील लोणी व राजुरा बाजार भागातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी तत्काळ मदत मिळावी, अशी मागणी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी विधानसभेत मंगळवार (दि.24) ला केली. शेतकऱ्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी निधी मंजूर झाला असतानाही उर्वरित लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप थांबविण्यात आले आहे. ही अन्यायकारक परिस्थिती तातडीने सोडवावी, असे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

नोव्हेंबर-डिसेंबर 2023 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि एप्रिल 2024 मध्ये झालेल्या गारपीटीमुळे वरुड तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. दिनांक 2 ऑगस्ट 2024 च्या गारपीट व अवेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी मदतीस मंजुरी देण्यात आली होती. या निर्णयानुसार अनेक शेतकऱ्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली, मात्र अद्याप अनेकांना मदत मिळालेली नाही. वरुड तालुक्यातील शेतकरी वर्षभर संत्रा व मोसंबीचे उत्पादन घेतात. दोन हंगामांत उत्पादन घेत असल्याने नुकसानीचा मोठा फटका बसतो. अशा परिस्थितीत शासनाने संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आमदार उमेश यावलकर यांनी केली.

### मदत निधीचे लवकरच वितरण

शेतकऱ्यांच्या हक्काच्या मदतीसाठी सरकारने त्वरित पावले उचलावीत. मंजूर निधीचा लाभ संत्रा व मोसंबी उत्पादकांना तातडीने मिळावा, जेणेकरून शेतकरी अडचणीतून सावरण्यास मदत होईल, अशी मागणी यावेळी आ.यावलकर यांच्याकडून करण्यात आली. शासनाने मंजूर केलेल्या निधीचे वाटप त्वरित सुरू करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन शासनाने दिले आहे. त्यामुळे उर्वरित लाभार्थी शेतकऱ्यांना लवकरच अनुदान मिळण्याची शक्यता आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक प्रभाकर चुने यांचे निधन



**चांदूर रेल्वे –** शहरातील शिक्षक कॉलनीतील प्रतिष्ठित रहिवासी, सेवानिवृत्त शिक्षक प्रभाकर शंकरराव चुने यांचे वयाच्या 92 व्या वर्षी सोमवारी (ता. 24) रात्री दुखद निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी दुपारी स्थानिक स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे विनोद व अजय ही 2 मुले, 2 मुली, जावई, नातवंड, सूना व बराच मोठा आप्तपरिवार आहे.



# अल्पवयीन मुलीला पळविले

**अमरावती –** एका अल्पवयीन मुलीला पळविण्यात आले. ही घटना दर्यापूर ठाण्याच्या हद्दीत 23 मार्च रोजी उघडकीस आली. एक 17 वर्षीय मुलगी ही मावशीकडे जात असल्याचे सांगून घरून निघाली. परंतु, ती उशिरापर्यंत घरी परतली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी मावशीला मोबाइलवर कॉल करून तिच्याबाबत विचारणा केली. त्यावर त्यांनी ती आपल्याकडे आलीच नसल्याचे त्यांना सांगितले. त्यामुळे कुटुंबीयांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाइक व मैत्रिणींकडे विचारणा करण्यात आली. मात्र, तिचा पत्ता लागला नाही. अशात तिला कुणीतरी अज्ञाताने पळवून नेल्याचा संशय आल्याने कुटुंबीयांनी दर्यापूर ठाण्यात तक्रार दाखल केली.

# अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाला आरोग्यमंत्र्यांची सरप्राईज व्हीजीट

## अधिकारी, कर्मचाऱ्यांची उडाली तारांबळ

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर, ( दि.25 )–** महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर मेळघाट दौऱ्यावर असताना मेळघाटातील पदाधिकारी व नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथील समस्येची जाणीव करून दिली. मेळघाटातील सरक्षित क्षेत्र असलेले हतरू व चुरणी प्राथमिक आरोग्य केंद्राचा नियोजित दौरा आटोपून नागपूरच्या दिशेने निघालेला वाहनांचा ताफा परतवाडा येथून अचलपूर उपजिल्हा रुग्णालय कडे वळला, ज्यामूळे त्यात उपजिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली.



उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथील महिला प्रसूती गृहाची मंत्री महोदयांनी पाहणी केली तसेच सामान्य वार्ड मध्ये जाऊन रुग्णांची आस्थेने विचारपूस केली. शिवसेना स्थानिक पदाधिकारी विलास सोळंकी यांनी आरोग्यमंत्र्यांपुढे उपजिल्हा रुग्णालयातील वर्षानुवर्षा पासून प्रलंबित असलेल्या समस्यांचा पाढा वाचला. एक्स-रे मशीन बंद, तपासणी न करता रेफर करण्यावर लगाम लागावा, शासकीय सेवेत असलेले डॉक्टर खाजगी दवाखान्यात थाटून बसलेले आहे, बालमृत्यूची जबाबदारी निश्चित करावी, सहा महिन्यापासून कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगार नाही, यासह अनेक समस्येचा उलगडा विलास सोळंके यांनी आरोग्यमंत्र्यांपुढे मांडला, त्यावर मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना समस्या सोडवण्याची आदेश दिले व पुढील दौऱ्यात आरोग्य विषयक कोणतीही समस्या राहता कामा नये अशी तंबी दिली.

यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड, शिवसेना तालुकाप्रमुख विवेक महल्ले, विलास सोळंके, अचलपूर शहर प्रमुख आतिश अहिर, पंकज पर्वतकर, बंटी पवार, सुनील चित्ते, राजाभाऊ माहुलकर यासह विविध पक्षातील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## मोबाईलवर मेसेज पाठवून दिला त्रास

**अमरावती –** अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीत राहणाऱ्या एका महिलेला अज्ञात आरोपीने मोबाईलवर मेसेज पाठवून त्रास दिला. आरोपी हा वारंवार संपर्क करून त्रास देत असल्याचे पाहून महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

**अमरावती –** फ्रेजरपुरा हद्दीतील एका 15 वर्षीय मुलीला तरुणाने फुस लावून पळवून नेले. या घटनेची तक्रार 22 मार्च रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात करण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी प्रविण शेषराव तायडे (रा. अमरावती) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# आरओचे पाणी थंड करण्यासाठी इथलीन ग्लायकॉलचा वापर

## प्लांटमधील पाण्याच्या शुद्धतेवर प्रश्नचिन्ह | प्रशासनाकडून पूर्णतः दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.25 ) –** परिसरात मोठ्या संख्येने पाण्याचे आरओ प्लांट असून 20 ते 40 रुपये प्रती कॅन दराने पाणी विकले जात आहे. त्यामुळे प्रत्येक घरात आरो प्लांटचे पाणी वापरले जाऊ लागले आहे. मात्र आरओ प्लांटच्या पाण्याच्या शुद्धतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आरओचे पाणी थंड करण्यासाठी इथलीन ग्लायकॉल या आरोग्यासाठी घातक ठरणार्या पदार्थाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित विभागाकडून याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे.



नियमांनुसार दर 6 महिन्यांनी पाण्याची शुद्धता तपासणे आवश्यक आहे. हे काम राष्ट्रीय भूजल सर्वेक्षण आणि अन्न व औषध विभागाचे आहे. मात्र, ही तपासणी होत नसून गावागावात गल्लीबोळात कुठलीही परवानगी न घेता अनधिकृत प्लांट उभारण्यात आले आहेत. हे प्लांट नोंदणीकृत आहेत का? नसतील तर त्यांच्यावर कारवाई का होत नाही? अशी नागरिकांमध्ये चर्चा असल्याने आरओ प्लांटच्या पाण्याच्या शुद्धतेवर प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. दरम्यान, आरओ प्लांटवर पाणी थंड न करता इथलीन ग्लायकॉल सारखा पदार्थ पाण्यात टाकला जातो. त्यामुळे पाण्याचा फ्रीझिंग पॉईंट डाऊन होतो. आणि पाणी त्वरित थंड होते. हेच पाणी लग्न समारंभामध्ये व सार्वजनिक कार्यक्रमांम वापरण्यात येते. हे पाणी पिल्यानंतर उलटी, मळमळ, किडनीचे आजार, हृदयाचे आजार असे गंभीर स्वरूपाचे आजार होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे याकडे शासकीय यंत्रणेने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

शुद्ध व स्वस्त पिण्याचे पाणी मिळावे म्हणून नागरिक आरओ प्लांटच्या पाण्याला पसंती देत आहेत. ही सर्वसामान्य नागरिकांची गरज ओळखून काही जणांनी आरओ प्लांटचा व्यवसाय सुरु केला आहे. विनापरवाना आरओ प्लांटचा सुळसुळाट झाला असून सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु आहे. हे पाणी शुद्ध की अशुद्ध आहे. याची तपासणी करण्यासाठी कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे दिसून येत आहे.

### कारवाई गरजेची

आरो प्लांटचे पाणी हे जार आणि बाटल्यांच्या माध्यमातून नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचवले जात आहे. त्यामुळे महिन्याला लाखो रुपयांपेक्षा अधिकचा व्यवसाय होत आहे. सर्वजण चांगले आरोग्य राखण्यासाठी हे पाणी पितात. मात्र, हे पाणी शरिरासाठी किती उपयुक्त आणि फायदेशीर आहे, या पाणी तपासणीच्या प्रश्नाकडे संबंधित विभाग सातत्याने दुर्लक्ष करत असून आरओ प्लांट मालकही पाण्याच्या शुद्धतेकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येत आहे. अन्न व औषधी विभाग या अनधिकृत व्यावसायीकावर कडक कारवाई करावी, असे बोलले जात आहे.



**अमरावती –** नवनिर्वाचित आमदार संजय खोडके यांचा सत्कार करताना माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती हरीश मोरे, हरिभाऊ मोहोड.



**अमरावती –** नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य संजय खोडके यांचा सत्कार करताना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, माजी नगरसेवक प्रशांत डवरे व इतर मान्यवर.



**अमरावती –** विधान परिषद सदस्यपदी अविरोध निवड झाल्यानंतर संजय खोडके यांचे स्वागत करताना प्रीती बंड, नाना नागमोते, प्रवीण आळसपुरे, धनंजय बंड, उमेश घुरडे.



**अमरावती–** विधान परिषद आमदार संजय खोडके यांचे स्वागत करताना राष्ट्रवादीचे माजी युवक शहर (जिल्हा) अध्यक्ष गुड्डू उर्फ प्रशांत धर्माळे व इतर मान्यवर.

# धारणी येथून दोन विद्यार्थ्यांची दिल्लीकरिता हवाई प्रवास



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी( दि.25 )–** मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांनी जिल्हा परिषद शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी मराठी नववर्षापूर्वी विशेष तीन दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. या सहलीत अमरावती जिल्ह्यातील एकूण 28 विद्यार्थी सहभागी होत असून त्यापैकी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, शिरपूर येथून सार्थक हरीदास कंटाळे (वर्ग 6 वा) आणि वैष्णवी हरीचंद्र जावरकर (वर्ग 6 वा) हि गुणवंत विद्यार्थी ची निवड झाली आहे. सहलीदरम्यान, विद्यार्थी राष्ट्रपती भवन, लाल किल्ला, संसद भवन, राजघाट, इंडिया गेट आणि अक्षरधाम मंदिर या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देतील, ज्यामुळे त्यांना देशाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची माहिती मिळेल. महत्वाचे म्हणजे या विद्यार्थ्याची यात्रा विमानाने होणार असून एक वेगळा अनुभव आणि आत्मविश्वास मिळणार आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक संतोष पांडे, वर्गशिक्षिका प्रीती वासनकर, गटशिक्षणाधिकारी गुणवंत वरघाट, केंद्रप्रमुख गोविंद फुलमाळी आणि सहाय्यक शिक्षक गजानन मेहरे, वर्षा रोडे, लतिका तळे, कुंवरसिंग कासदेकर आणि वर्षा सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांना हा प्रवास त्याच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल.


## जाहीर नोटीस

गोकुलम गोरक्षण संस्था अमरावती ता. जि. अमरावती र.न. ई-726/अमरावती या न्यासाचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णनाची शेती विकणे आहे.

**शेतीचें वर्णन** – मौजा नांदुरा बु ता.जि. अमरावती येथिल संस्थेच्या मालकीची भुमापन कमांक 158 भोगवट 1 जिराईत शेती लागवळ योग्य क्षेत्रफळ 1.हे.63आर पोटखराब 0.01. 00 आर एकुन 1हे.64 आर आकार रूपये 6.05 पैसे वरील वर्णनाची शेती खालील अटी व शर्तीवर विक्री करावयाची आहे

1. प्राप्त निविदेपैकी जास्त रक्कम देणाऱ्यास सदरची शेती देण्यात येईल
2. लीफाफा बंद निवीदेसोबत रू 5000/ अक्षरी पाच हजार रूपये रकमेचा गोकुलम गोरक्षण संस्था अमरावती ता. जि. अमरावती र.न. ई-726/अमरावती या नावाचा डिमांड डाफ्ट किवा धनादेश जोडणे बंधनकारक आहे
3. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे सर्वश्री विस्वस्त मंडळाचे अधिकारात राहील
4. खरेदीचा सर्व खर्च शेती खरेदी करणाऱ्यास करावी लागेल
5. निवीदा दिनांक 04/04/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता संस्थेचे कार्यालय डॉ. मुरके हॉस्पीटल वालकट कंम्पाउड अमरावती येथे सर्वासमक्ष उघडण्यात येईल
6. सदरची निवीदा मंजुर केल्यानंतर मा. सह. धर्मदाय आयुक्त अमरावती यांचे परवानगीने व दिलेल्या अटीनुसार मंजुर केलेल्या निविदा धारकास शेती खरेदी करावी लागेल.

तरी खरेदी करणाऱ्या इच्छुकांनी आपली निवीदा बंद लिफाफ्या मध्ये दिनांक 31/03/2025 रोजी च्या आत खालील पत्यावर पाठवावी.

दिनांक :-

**डॉ. हेमत रामचंद्र मुरके**
**गोकुलम गोरक्षण संस्था अमरावती**
**ता. जि. अमरावती**
**र.न. ई-726/ अमरावती**




# मद्यपानापासून दूर रहा...

अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस म्हणजेच ऑस्टिओ नेक्रोसिस. यामध्ये कंबर आणि मांडी यांच्यामधील सांध्याला योग्य त्या प्रमाणात रक्तपुरवठा पोहोचत नसल्याने हाडांच्या ऊती मृत पावतात. अति मद्यपानाच्या सवयींमुळे ६० टक्के तरुणांना उतारवयात अव्हॅस्कुलर नेक्रोसिस म्हणजेच एव्हीएन चा धोका असतो. म्हणजेच मद्यपान ५० वर्षे आणि त्यावरील वयाच्या प्रौढांमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचे प्रमुख कारण ठरत असून अशा रुग्णांना प्रत्यारोपणाची आवश्यकता भासते.



अधिक प्रमाणात मद्यपान केल्याने रक्तवाहिन्यांमध्ये चरबीयुक्त पदार्थ जमा होऊ शकतात. ते हाडांमधील रक्त प्रवाह अडवतात, परिणामी अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होतो. अति मद्यपान करणाऱ्या ५० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुमारे १० पैकी ५ व्यक्तींमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसची समस्या आढळून येते. अशा रुग्णांना 'हिप रिप्लेसमेंट' शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. ताज्या आकडेवारीनुसार प्रौढांमध्ये 'एव्हीएन'च्या प्रकरणांमध्ये १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे २५ ते ३५ वयोगटातील ६० टक्के तरुणांना अति मद्यपानामुळे वयाच्या पन्नाशीतच अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होण्याची शक्यता वाढते.

आरोग्य विशेष

डॉ. शरद ठुबे

**रक्तपुरवठ्याअभावी मरतात हाडांच्या ऊती**


अव्हॅस्कुलर नेक्रोसिस ही अशी स्थिती आहे, जिथे रक्तपुरवठ्याअभावी हाडांच्या ऊती मरतात. त्यामुळे सांधेदुखी आणि हाडे ठिसूळ होतात, तुटतात. एखादी व्यक्ती साधारणपणे आठ ते १० वर्षे सलग अल्कोहोलचे सेवन करत असल्यास आठवड्यातून ४०० मिलीलीटर किंवा त्याहून अधिक मद्य आपल्या शरीरात ढकलतो.

**चरबी वाढते**

मद्यपानामुळे सीरम ट्रायग्लिसराइड आणि कोलेस्टेरॉलची पातळी तसेच अस्थिमज्जामध्ये चरबी जमा होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढू शकते. अर्थात अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचा धोका इतर घटकांवरदेखील अवलंबून असतो. जसे की, तंबाखूचा वापर, जुनाट आजार आणि अनुवांशिकता हीदेखील त्याचमागील कारणे असू शकतात. या आजाराची लक्षणे म्हणजे कंबरदुखी, स्नायुंमधील कडकपणा आणि स्नायुंच्या हालचालींवर येणाऱ्या मर्यादा ही आहेत. या रुग्णाप्रमाणेच, नितंबाचे हाड मोडलेल्या रुग्णांवर टोटल हिप रिप्लेसमेंटने उपचार केले जातात. वेळीच उपचार न केल्यास अव्हॅस्कुलर नेक्रोसिसमुळे सांध्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होऊ शकते. त्यामुळे 'हिप रिप्लेसमेंट' प्रक्रियेची आवश्यकता लक्षात घेणे गरजेचे ठरते.

# खांदेदुखी टाळा, निरोगी राहा

खांद्याच्या दुखण्यामागे बरीच कारणं असू शकतात. दुखापत, सातत्याने होणारी हालचाल, वजनदार वस्तू उचलणं, अपघात, खेळणं किंवा वाढतं वय या कारणांमुळे खांद्यांचं दुखणं उद्भवू शकतं. खांद्याच्या दुखण्यामुळे हातांच्या हालचालींवरही मर्यादा येतात. खांद्यांमध्ये तीन महत्त्वाची हाडं असतात. ही हाडं खांद्यांच्या सांध्यांशी जोडलेली असतात. खांद्याच्या कोणत्याही भागात या वेदना जाणवू शकतात.



व्यायामाने या वेदनांवर नियंत्रण मिळवता येतं. इतकंच नाही तर, या व्यायामाचे दीर्घकालीन लाभही आहेत. व्यायामामुळे स्नायू लवचिक व्हायला मदत होते. खांदे मागून पुढे फिरवणं, बालासन, खांद्यांचे स्नायू ताणणं, डंबेल्स उचलणं अशा व्यायामांमुळे लाभ होऊ शकतात. हे सर्व व्यायाम अगदी सोप्या पद्धतीने करता येतात. शिवाय ते तुम्ही कुठेही करू शकता. हे व्यायाम नियमित केल्यामुळे वेदना बऱ्याच प्रमाणात कमीह होऊ शकतात.

खांदा बराच काळ दुखत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. खांद्याच्या व्यायामांनी आराम मिळाला तर डॉक्टरांकडे जाण्याची गरज लागणार नाही. पण खांद्यांमध्ये सूज, तीव्र स्वरूपाच्या वेदना, हात आणि खांद्यांमध्ये जाणवणारा अशक्तपणा, हातांमधल्या संवेदना जाणं, खांद्यांमध्ये हालचाल करताना त्रास होणं अशी लक्षणं दिसत असतील तर तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

सांधेविकार

खांद्याच्या दुखण्यावर काही घरगुती उपाय करता येतील. अनेकदा जीवनशैली, चुकीच्या पद्धतीने बसणं, झोपणं यामुळे खांद्यांचं दुखणं उद्भवतं. त्यामुळे आपण जीवनशैलीत सकारात्मक बदल करणं गरजेचं आहे. नियमित व्यायाम करणं गरजेचं आहे. खांदेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळायला हव्यात. खांद्यांमध्ये दाह जाणवत असेल तर दाह कमी करणारी औषधं घेता येतील. अन्यथा, हिरव्या पालेभाज्या, टोमॅटो, ऑलिव्ह ऑईल, मासे, स्ट्रॉबेरी, संत्री, ब्लूबेरी अशी फळं यांचा आहारात समावेश करायला हवा. दुखापत गंभीर स्वरूपाची असल्यास शस्त्रक्रियेची गरज लागू शकते. खांदेदुखी तीव्र स्वरूपाची नसेल तर गरम आणि गार पाण्याचा शेकही देता येईल.


खांद्याच्या दुखण्याची अनेक कारणं आहेत. या कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे. नेमकं निदान करून त्यावर उपचार होणं आवश्यक असल्यामुळे याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि निरोगी आयुष्य जगा.

# कानाचे दुखणे असू शकते ब्रेन ट्युमरचे लक्षण

कानाच्या दुखण्याला संसर्ग समजून दुर्लक्ष करण्याची चूक कधीही करू नका कारण हे ब्रेन ट्यूमरचे लक्षण असू शकते. अलीकडेच एका १९ वर्षांच्या तरुणासोबतही असेच घडले. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये संबंधित तरुणाला चक्कर आली आणि दिसण्यात तसेच बोलण्यात काही समस्या निर्माण झाल्या. डॉक्टरांकडे गेल्यावर कानात संसर्ग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्याला सांगण्यात आले; पण चार महिन्यांनंतर त्याला ग्लिओब्लास्टोमा ब्रेन ट्युमर असल्याचे उघड झाले तेव्हा सगळ्यांनाच धक्का बसला.

**सर्वात धोकादायक कर्करोग**

कुटुंबीयांनी सांगितले, की डॉक्टरांनी प्रथम या आजाराचे ग्रंथींच्या तापाचा दुष्परिणाम म्हणून वर्णन केले आणि कानाच्या संसर्गासाठी औषध दिले. पण काही दिवसांमध्ये मुलाची प्रकृती अधिक बिघडू लागल्यामुळे त्याला दुसऱ्या डॉक्टरांकडे नेण्यात आले. तेथे दोन आठवड्यांच्या उपचारानंतर सीटी स्कॅन करण्यात आले. या तपासणीत त्याला 'ब्रेन स्टेम ग्लिओब्लास्टोमा' हा सर्वात धोकादायक कर्करोग असल्याचे आढळून आले.



**उपचार कसे होते?**

'ब्रेन स्टेम ग्लिओब्लास्टोमा'वर उपचार करणे अजिबात सोपे नाही. या मुलावर सहा आठवडे रेडिओथेरपी केली. २०२४ च्या डिसेंबर महिन्यातील ख्रिसमस सणाच्या एक दिवस आधी त्याच्यावरील उपचार संपले; परंतु नंतरही दुष्परिणाम दिसतच होते. पुढे तर त्याला काहीही गिळता येत नव्हते. बेडवरून उठताही येत नव्हते. चार जानेवारीला श्वासोच्छवास अचानक थांबला आणि तो कोमात गेला. २४ तासांनंतर त्याला शुद्ध आली. उपचार सुरू होतेच. पाच आठवड्यांनंतर घरी परतला आणि २५ फेब्रुवारीला त्याचा मृत्यू झाला.

आरोग्यभान

डॉ. रवींद्र सोमाणी

**'ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर' म्हणजे काय ?**

ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर' हा ब्रेन ट्यूमरचा एक प्रकार आहे, जो 'ग्लिअल' पेशींपासून उद्भवतो. ही गाठ मेंदूच्या आतील भागात वाढते आणि त्याचा मेंदूच्या सामान्य कार्यावरही परिणाम होऊ शकतो. हा जगातील सर्वात धोकादायक कर्करोगांपैकी एक आहे.

**'ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर'ची लक्षणे**

- ✻ डोकेदुखी
- ✻ कान दुखणे
- ✻ उलट्या
- ✻ अशक्तपणा
- ✻ स्मरणशक्ती कमी होणे

**ग्लिओब्लास्टोमा ट्यूमरची कारणे**

- ✻ अनुवांशिक उत्परिवर्तन
- ✻ रेडिएशनचा संपर्क
- ✻ विशिष्ट रसायनांच्या संपर्कामुळे मेंदूला झालेली दुखापत


# टॉन्सिल स्टोनविषयी...

खडे फक्त किडनीमध्येच नाही तर घशातही तयार होऊ शकतात. याला 'टॉन्सिल स्टोन' म्हणतात. फार कमी लोकांना याची जाणीव असली तरी ही एक सामान्य समस्या आहे.

हे खडे अन्न, श्लेष्मा आणि मृत पेशींमध्ये असणाऱ्या पोषक घटकांपासून बनलेले असतात. ते घशातील टॉन्सिल ग्रंथीजवळ जमा होतात. मात्र नंतर त्यामध्ये बॅक्टेरिया आणि विषाणू तयार होतात. त्यामुळे धोकादायक आजारांचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत टॉन्सिल स्टोन आणि त्यामुळे होणाऱ्या समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.

**घशात टॉन्सिल स्टोन कुठे?**

'टॉन्सिल स्टोन' घशाच्या मागील बाजूस असणाऱ्या पांढऱ्या किंवा पिवळ्या दगडाच्या तुकड्यासारखा असतो. बाहेरून पाहिल्यास हे खडे पांढरे किंवा पिवळ्या पुरळसारखे दिसतात. सुरुवातीला त्याचा आकार वाटाण्याएवढा किंवा त्याहूनही लहान दिसू शकतो. परंतु वेळीच उपचार न केल्यास, काही प्रकरणांमध्ये आकार गोल्फच्या चेंडूइतकाही मोठा होऊ शकतो.




व्याधी विचार

डॉ. महेश दळे

**कोणत्या समस्या उद्‌भवतात?**

घशाचा अन्न गिळले जाते तो भाग म्हणजे टॉन्सिल असून ते स्नायूंनी बनलेले आहे. त्यातही भेगा असल्याने टॉन्सिल पॉकेट असेही म्हणतात. त्यामुळेच या कप्प्यामध्ये अन्न, मृत पेशी आणि जीवाणू यातील काही घटक जमा होतात, तेव्हा हळूहळू घट्ट होऊन ते 'टॉन्सिल स्टोन'चे रूप घेतात. टॉन्सिलमध्ये खडे होणे ही एक सामान्य समस्या असते आणि अनेकदा हा त्रास असणाऱ्या लोकांना याची जाणीवही नसते. यावर वेळीच उपचार न केल्यास ते ट्यूमरचेही कारण बनू शकते.


**कानातही वेदना**

'टॉन्सिल स्टोन' तयार होतो तेव्हा सुरुवातीला श्वासाच्या दुर्गंधीशिवाय कोणताही त्रास होत नाही. परंतु खड्याचा आकार वाढू लागतो किंवा कडक होऊ लागतो तेव्हा घसा आणि कानात वेदना होतात तसेच गिळण्यास त्रास होतो. 'टॉन्सिल स्टोन' झाल्यानंतर घशात काहीतरी अडकल्यासारखे वाटते. त्यामुळे वेदनाही कायम राहतात. तेव्हा अशा कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष करु नये.

# तरुण वयातही वंध्यत्व समस्या

देशात वंध्यत्वाची समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतात वंध्यत्व दर ३.९ ते १६.८ टक्क्याच्या दरम्यान आहे. एखाद्या जोडप्याने मूल होण्यासाठी १२ महिने किंवा त्याहून अधिक काळ नियमित लैंगिक संबंध ठेवले आणि तरीही ती स्त्री गर्भधारणा करत नसेल, तर त्यास वंध्यत्व समजले जाते. आता ही समस्या तरुण वयातच महिलांमध्ये दिसून येत आहे.

आजच्या काळात जीवनशैलीतील बदल, प्रदूषण आणि वैद्यकीय परिस्थितीमुळे वंध्यत्वाची प्रकरणे वाढत आहेत. 'पीसीओएस', एंडोमेट्रिओसिस, थायरॉईड रोग, मधुमेह आणि लठ्ठपणा यांसारख्या परिस्थितींमुळेदेखील वंध्यत्व येऊ शकते. खेरीज केवळ महिलांमध्येच नाही तर पुरुषांमध्येही वंध्यत्व वाढत आहे. पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होणे, इरेक्टाइल डिसफंक्शन यासारख्या समस्याही वाढत आहेत.



लाईफस्टाईल

डॉ. तुषार गलांडे

**वंध्यत्वाचा उपचार कसा केला जातो?**

एखाद्या जोडप्याला वंध्यत्वाचा त्रास होत असेल तर ते आधी औषधे घेतात आणि नंतर नैसर्गिक मार्गाने गर्भधारणेचा प्रयत्न करतात. हे शक्य नसल्यास इंट्रायूटरिन रेसेमिनेशन केले जाते. यातूनही मूल होत नसेल तर आय.व्ही.एफ. चा अवलंब केला जातो. आता तर वैद्यकीय शास्त्रात आणखी प्रगती झाली आहे. आता एग फ्रीझिंग आणि सरोगसीद्वारे गर्भधारणा होऊ शकते. तरुण वयातच महिलांची अंडी गोठविली जातात. नंतर गर्भधारणेचा निर्णय घेतला की अंडी डीफ्रॉस्ट करून 'आयव्हीएफ' मध्ये वापरली जाऊ शकतात. गेल्या काही वर्षांत 'आयव्हीएफ'चे हे तंत्रज्ञान लक्षणीय पद्धतीने वापरले जात आहे. अनेकांना त्याची मदत मिळत आहे.

**वंध्यत्व कसे टाळावे?**

ही समस्या टाळायची तर आहाराची काळजी घ्या. धूम्रपान करू नका आणि अल्कोहोलचे सेवन करू नका. गर्भनिरोधक औषधे घेणे टाळा. जीवनशैली योग्य ठेवा. झोपेची आणि उठण्याची वेळ सेट करा. दररोज किमान अर्धा तास व्यायाम करा.

# उच्च रक्तदाबाच्या रुग्णांत वाढ

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ'च्या आकडेवारीवरून दिसून आले आहे, की सुमारे ३३ टक्के शहरी आणि २५ टक्के ग्रामीण भारतीय उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. यापैकी २५ टक्के ग्रामीण आणि ४२ टक्के शहरी लोकांना हा आजार असल्याची माहिती नाही. याचे कारण म्हणजे लोकांना उच्च रक्तदाबाची लक्षणे माहीत नसतात. यामागील एक कारण म्हणजे या आजाराची लक्षणे सहज दिसून येत नाहीत. त्यामुळेच उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' असेही म्हणतात. चिंतेची बाब म्हणजे आता हा आजारही तरुण वयातच होत आहे. २५ ते ४० वर्षे वयोगटातील लोकही याचे मोठ्या प्रमाणात बळी ठरत आहेत.

**तरुण वयात उच्च रक्तदाब**

उच्च रक्तदाब हा गंभीर आजार आहे. तरुणांमध्ये त्याचे प्रमाण वाढण्यामागे अनेक कारणे असू शकतात.



✻ **वाईट जीवनशैली** : रात्री उशिरा झोपण्याची सवय आरोग्यास हानी पोहोचवत आहे.

✻ **वाईट खाण्याच्या सवयी:** फास्ट फूड, प्रक्रिया केलेले अन्न आणि गोड पेये यांचे अतिसेवन. या पदार्थांमुळे उच्च रक्तदाबाची समस्या उद्‌भवते.

✻ **व्यायाम न करणे** : व्यायाम न करणे हेदेखील तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाचे एक प्रमुख कारण आहे.

✻ **मानसिक ताण आणि चिंता:** तरुणांमध्ये मानसिक तणाव आणि चिंता या समस्या वाढत आहेत. हेदेखील उच्च रक्तदाबाचे कारण आहे.

✻ **धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन:** धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन वाढत असल्यामुळे रक्तदाब वाढू शकतो. **लक्षणे** – हा रोग तपासणीद्वारे ओळखता येतो. तथापि, काही लक्षणेही दिसू शकतात. तीव्र डोकेदुखी, छातीत दुखणे, चक्कर येणे ही यातील काही लक्षणे आहेत.

लाईफस्टाईल

डॉ. प्रसन्न नेने


**औषध होऊ शकते बंद**

झोपणे आणि वेळेवर उठणे, व्यायाम करणे हे उपाय तुम्हाला या आजारापासून दूर नेऊ शकतात. त्याचप्रमाणे कमी प्रमाणात मीठ खाणे, मन शांत ठेवण्यासाठी ध्यान करणे यासारख्या सुधारणा करूनही हा आजार आटोक्यात ठेवता येतो.

आरोग्यभान

## कॅल्शियमची कमतरता असल्यास...

आता चुकीच्या जीवनशैलीचे परिणाम आपल्या आरोग्यावर होऊ लागले आहेत. आहारातल्या बदलांमुळे कमी वयात विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम गरजेचं असतं. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडं ठिसूळ होऊ लागली आहेत. मात्र काही पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक तेवढं कॅल्शियम मिळत नाही.




शीतपेयांमधल्या कार्बन डाय ऑक्साइड आणि फॉस्फरसमुळे हाडं ठिसूळ होतात. शरीरात कॅल्शियम योग्य प्रकारे शोषलं जात नाही. यासह चॉकलेटमधल्या काही घटकांमुळेही शरीरातल्या कॅल्शियमचं प्रमाण कमी होतं.

आहारात मिठाचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मिठातल्या सोडियममुळे शरीरातलं कॅल्शियम मूत्रावाटे बाहेर निघून जातं. म्हणूनच मिठाचं प्रमाण कमी ठेवण्याचा सल्ला दिला जातो.


चहा–कॉफीचं अतिसेवनही शरीरासाठी घातक आहे. यातल्या कॅफेनमुळे शरीरातलं कॅल्शियम नष्ट होऊ लागतं.

जास्तीचा मांसाहारही घातक ठरू शकतो. प्राणीजन्य प्रथिनं हाडांचं नुकसान करू शकतात. त्यामुळे मांसाहारही प्रमाणात करावा.

जाणून घ्या

## स्पाँडिलायटिस सतावतोय?

सध्या स्पाँडिलायटिसचं प्रमाण वेगाने वाढत आहे. एके काळी प्रौढांना होणारा हा आजार आता तरुणांना विळख्यात घेत आहे. १०० पैकी एका तरुणाला आज स्पाँडिलायटिस आहे. त्यातही पुरुषांना हा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. बैठी जीवनशैली, बसण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या पद्धती, पोषक आहाराची कमतरता, व्यायामाचा अभाव ही स्पाँडिलायटिसची कारणं आहेत. आयुर्वेदिक उपायांनी हा विकार नियंत्रणात ठेवता येईल. स्पाँडिलायटिसच्या रुग्णांनी आम्ल म्हणजे आंबट तसंच कशाय पदार्थ खाऊ नयेत. लाल मांस, आंबट फळं असे अतिआम्लयुक्त पदार्थ टाळायला हवेत. बटाट्यांमुळे शरीरात वात दोष निर्माण होतो यामुळे हाडांचं नुकसान होऊ शकतं.



स्पाँडिलायटिसमुळे जडणाऱ्या बद्धकोष्ठतेला कारक ठरणारे पदार्थ रुग्णांनी टाळायला हवेत. बद्धकोष्ठतेमुळे मानेतल्या वेदनांचं प्रमाण वाढतं तसंच मानेतले स्नायू आखडतात. गायीचं तूप वातशामक असतं. स्नेहापनासारख्या गायीचं तूप वापरून केल्या जाणाऱ्या उपचारांमुळे आराम पडू शकतो. औषधी तेलाने मसाज केल्यामुळेही आराम मिळू शकतो. शल्लाकी, रसना, गुग्गुळ, गुडुची, अश्वगंधा, सुंठ ही आयुर्वेदिक औषधं या विकारात उपयुक्त ठरतात.

हृदयारोग्य

## 'हार्ट फेल्युअर'चा मोठा धोका

भारतात मधुमेहानंतर हृदयरोगाचा धोका सर्वाधिक मानला जातो. मधुमेहामध्ये रुग्णाचे एकाएकी प्राण जाण्याची शक्यता कमी किंवा अगदीच नगण्य असते. मात्र हृदयरोगामध्ये हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णाचे प्राण तडकाफडकीही जाऊ शकतात. विशेषत: 'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाचे प्राण जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे हृदयरोग, त्यातही 'हार्ट फेल्युअर' अधिक गंभीर मानला जातो. पण डॉक्टरांच्या मते 'हार्ट फेल्युअर' म्हणजे जीवनाचा अंत हे समीकरण आता बदलू लागलं आहे.



'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाच्या हृदयाचे स्नायू हळूहळू कमकुवत होत जातात आणि संपूर्ण शरीराला लागणाऱ्या रक्ताचा पुरवठा करण्यास असक्षम ठरतात. या व्याधीच्या सुरुवातीला शरीराचा रक्तपुरवठा वाढवण्यासाठी हृदय विशेष प्रयत्न करून स्वत:चा आकार वाढवतं आणि अधिक जोरात आकुंचन पावतं. याची परिणती हृदयाचा आकार वाढण्यात होते. या अवस्थेला 'एन्लार्ज्ड हार्ट' असं म्हटलं जातं. यात हृदयाच्या आकुंचन पावणाऱ्या स्नायूंचा आकार वाढतो आणि एकूणच स्नायूंचं वजनही वाढतं. यामुळे सुरुवातीला तरी हृदय अधिक जोरात रक्त 'पंप' करतं. वेगात रक्त पंप केल्यामुळे हृदयाचं 'आउटपुट' वाढतं. हृदयाने स्वत:हून केलेल्या या सुधारणेमुळे समस्या झाकली जाते, परंतु समस्येवर उत्तर शोधलं जात नाही. त्यामुळे शरीर आणि हृदय यांच्यातला ताळमेळ हरवतो. परिणामी, रुग्णामध्ये थकवा येणं, श्वसनाला त्रास होणं आणि 'हार्ट फेल्युअर'ची इतर लक्षणं दिसू लागतात. हृदयविकाराचा किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या आणि हृदयविकाराच्या झटक्यांचा इतिहास असलेल्या रुग्णांमध्ये 'हार्ट फेल्युअर' होण्याची शक्यता अधिक असते. देशात एकूण आठ ते दहा दशलक्ष रुग्ण 'हार्ट फेल्युअर'मुळे त्रस्त आहेत. शहरी भागात हे प्रमाण लोकसंख्येच्या १० टक्के तर ग्रामीण भागात ते लोकसंख्येच्या चार ते पाच टक्के आहे. अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतात 'हार्ट फेल्युअर'ची व्याधी कमी वयात जडू शकते. भारतीय रुग्णांमध्ये हे वय सरासरी ५६ ते ६१ वर्षं असून पाश्चिमात्य देशांमध्ये ते ७२ वर्षं आहे.

# आरोपी प्रशांत कोरटकरला तीन दिवस पोलीस कोठडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :**
छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान करणारा, इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लिल शिवीगाळ करून त्यांना धमकावणारा तथाकथित पत्रकार आरोपी प्रशांत कोरटकरला न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.



गेल्या महिनाभरापासून पोलिसांना गुंगारा देत असलेल्या कोरटकरला कोल्हापूर पोलिसांनी सोमवारी तेलंगणा राज्यातून बेड्या ठोकल्या. त्याला मंगळवारी दुपारी कोल्हापूर न्यायालयात हजर केले.तेथे शिवप्रेमींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

कोल्हापूर न्यायालयातील सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी प्रशांत कोरटकर याच्या ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्याच्या आवाजाचे नमुने घ्यायचे असून त्याच्या चौकशीसाठी सात दिवसांची कोठडी हवी असल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले होते. मात्र, जिल्हा न्यायालयाने प्रशांत कोरटकर याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. न्या. एस.एस. तट यांनी हा निर्णय दिला.

प्रशांत कोरटकर हा तब्बल गेल्या महिनाभरापासून फरार होता. कोल्हापूर पोलीस कोरटकरचा कसून शोध घेत होती. कोरटकर याची पोलीस कोठडी मिळाल्यामुळे चौकशीत तो काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

प्रशांत कोरटकर याला पोलीस ठाण्यातून न्यायालयात नेताना आणि परत आणताना कोल्हापुरातील शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपमानजक टिप्पणी करणाऱ्या कोरटकरला कोल्हापुरी चपलेने बदडण्याची योजना आखण्यात आली होती. मात्र, न्यायालयाच्या परिसरात पोलीस अधीक्षकांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केल्यामुळे आंदोलकांना प्रशांत कोरटकरपर्यंत पोहोचता आले नाही. प्रशांत कोरटकर याला सुनावणी झाल्यानंतर न्यायालयातून बाहेर आणत असताना एका व्यक्तीने त्याच्यावर चप्पल भिरकावली. मात्र, पोलिसांनी तात्काळ या व्यक्तीला ताब्यात घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी छावा चित्रपटावर आपली भूमिका मांडली होती. त्यांनी ब्राह्मण समाजाचा द्वेष केल्याचा आरोप करीत कोरटकर याने फोन करून थेट धमकी दिली. जिथं असाल तिथे येऊन ब्राह्मणांची ताकद दाखवू, तुम्ही कितीही मराठे एकत्र करा, असे म्हणत शिवीगाळ आणि मारण्याची दिली धमकी दिली होती.

# आंदोलनाला परवानगी द्यायला नको होती..

## काँग्रेस नेते हुसेन दलवाई यांनी केली नागपुरात पाहणी



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २५ :**
काँग्रेस नेते तथा काँग्रेसच्या सत्यशोधन समितीचे सदस्य हुसेन दलवाई मंगळवारी दंगलग्रस्त भागाची पाहणी करण्याकरिता नागपुरात पोहोचले. त्यांनी पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल यांची भेट घेतली.

नागपूर दंगलग्रस्त भागात पाहणी करण्यासाठी काँग्रेसने सत्यशोधन समिती स्थापन केली आहे. गेल्या शनिवारी समितीतील सदस्य माणिकराव ठाकरे आणि आमदार साजिद पठाण नागपुरात आले होते. परंतु त्यांना दंगलग्रस्त भागात जाण्याची परवानगी पोलिसांनी दिली नव्हती. आता हुसेन दलवाई नागपूर भेटीवर आले आहेत.

त्यांनी रविभवन या शासकीय निवासस्थानी कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यानंतर दुपारी पोलीस आयुक्तालयात पोहोचले. पोलिसांची कारवाई एकतर्फी होती. झालेली घटना दुर्देवी होती. पोलिसांनी संयम बाळगायला हवा होता. , अशी प्रतिक्रिया दलवाई यांनी व्यक्त केली.

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलास आंदोलनाची परवानगी द्यायला नको होती. आंदोलना दरम्यान चादर जाळणाऱ्यांविरुद्ध तातडीने कारवाई रायला हवी होती. आता मुस्लीम युवकांवर कारवाई केली जात आहे. सीसीटीव्ही कॅमेरे तपासूनच आरोपींना ताब्यात घेतले पाहिजे. पोलीस १८ वर्षांखालील युवकांना अटक करत आहे. त्यांच्या भवितव्याचे काय? असा सवालही हुसेन दलवाई यांनी केला. पोलिसांनी नियम आणि कायद्याप्रमाणे कारवाई करावी, अशी मागणीही केली. आयुक्तांनी दलवाई यांना दोन कॉन्स्टेबलची सुरक्षा पुरवली आहे. संचारबंदी उठवण्यात आल्याने त्यांनी दंगलग्रस्त भागाची पाहणी केली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अपमान करणारा तसेच इतिहासाचे अभ्यासक सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देणारा कोरटकर हा एक महिन्यांपासून फरार होता. त्याला तेलंगणा राज्यातून अटक करण्यात आली. प्रशांत कोरटकर तेलंगणामध्ये एका काँग्रेस नेत्याच्या घरी होता, असा आरोप भाजपने केला. तो नेमका तो कोणाच्या घरी होता. त्याला कोणी संरक्षण दिले यांची चौकशी झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

## संभाजी महाराजांना मनुस्मृतीनुसार शिक्षा..



औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराज यांना ज्या पद्धतीने मारले ही क्रूरता होती. दाराशिकोहला जसे मारले त्याच पद्धतीने औरंगजेबने संभाजी महाराजांनाही मारले. शंभुराजेंना मारण्याची पद्धत मनुस्मृती प्रमाणे पंडितांनी ठरवली, असे वक्तव्य हुसेन दलवाई यांनी केले आहे.

गेली काही दिवस औरंगजेबाच्या कबरीचा वाद पेटला आहे. छावा चित्रपटानंतरा औरंगजेबाची कबर काढून टाकण्यात यावी, अशी मागणी काही संघटनांकडून करण्यात येत आहे. यामुळे नागपूरमध्ये दंगलही झाली. यातच आता हुसेन दलवाई यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे पुन्हा वातावरण तापणार की काय अशी शक्यता निर्माण झाली आहे.

हुसेन दलवाई म्हणाले की, औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराज यांना ज्या पद्धतीने मारले ही क्रूरता होती. त्याने आपल्या भावाला म्हणजे दाराशिकोहला जसे मारले त्याच पद्धतीने औरंगजेबने संभाजी महाराजांनाही मारले. शंभुराजेंना मारण्याचा आदेश दिल्ल्यानंतर पंडीतांनी मनुस्मृती प्रमाणे त्यांना मारण्यात यावे असे सांगितल्याचे वादग्रस्त विधान दलवाई यांनी केले आहे. इतिहासाचा हा पैलू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मान्य करतील का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर पुढे बोलताना ते म्हणाले की वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. दलवाई यांच्या आरोपानंतर काय प्रतिक्रिया उमटणार? हे पाहणं महत्त्वाचे ठरेल.

# कचऱ्यात सापडले १० ते ११ अर्भके

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :**
दौंड शहरात मृत अवस्थेत अर्भके सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. यामध्ये साधारणतः दहा ते अकरा अर्भक असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरु केला आहे. दौंड शहरातील बोरावके नगर परिसरात नवजात बालकांचे अर्भक मृत अवस्थेत सापडले असल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली.



दौंड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. शहरात अर्भक सापडल्याने याच परिसरात गर्भपात केंद्र असून येथे अवैध गर्भपात होत असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हे सर्व अर्भक हे प्लास्टिकच्या डब्यात बंद केलेले असल्याचे आढळून आले आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस, सहाय्यक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील, पोलिस उपनिरीक्षक युवराज घोडके यांच्यासह कर्मचाऱ्यांनी भेट देत घटनेची माहिती घेतली.

# एसटी महामंडळाच्या बसेसवर आता केवळ मराठीतूनच संदेश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :**
येत्या गुढीपाडव्यापासून मराठी नववर्ष सुरू होत आहे या मुहूर्तावर राज्यामध्ये परिवहन विभागामार्फत नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यावसायिक वाहनावर लिहिले गेलेले सामाजिक संदेश हे मराठीत असले पाहिजेत असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाला दिले आहेत.





या संदर्भात मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र राज्याची मराठी ही अधिकृत राज्य भाषा आहे. महाराष्ट्रातील नागरिक हे प्रामुख्याने मराठी भाषिक आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नातून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. सहाजिकच मराठी भाषेचे संवर्धन करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. तथापि, राज्यात नोंदणी असलेल्या अनेक व्यावसायिक वाहनांवर सामाजिक संदेश, जाहिरात आणि प्रबोधनात्मक माहिती हिंदीत किंवा इतर भाषांमध्ये लिहीलेले असतात. (उदा . बेटी बचाव बेटी पढाव) त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारवर बंधने येतात.

या पुढे असे सामाजिक संदेश, जाहीरात व प्रबोधनात्मक माहिती मराठी भाषेत प्रदर्शित केल्यास (उदा . मुलगी वाचवा..मुलगी शिकवा..!) महाराष्ट्रातील जनतेला अधिक उपयुक्त माहिती मिळेल आणि मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होईल. तसेच मराठी भाषेचा योग्य सन्मान राखला जाईल. त्यासाठी येत्या गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत असलेल्या सर्व व्यावसायिक वाहनांवरील सामाजिक संदेश तसेच इतर महत्वाच्या जाहीराती व प्रबोधनात्मक माहिती मराठी भाषेत लिहीण्याची अंमलबजावणी सुरु करावी. तसे निर्देश परिवहन आयुक्त यांना दिल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# डीएमओच्या संगनमताने धानाची परस्पर विल्हेवाट?

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २५ :**
आधारभूत केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाचा साठा मिलींगसाठी उचल होईपर्यंत शाबूत असणे गरजेचे असताना, एका केंद्रावरील धानाची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याची माहिती आहे . जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातील एका केंद्र संचालकाने ही हेराफेरी केल्याचे दिसून येत आहे.

शेतकऱ्यांच्या धानाला योग्य भाव मिळावा, अल्प दरारत खरेदी करून व्यापाऱ्यांकडून फसवणूक होवू नये म्हणून पणन महासंघाच्यावतिने आधारभूत धान खरेदी केंद्र चालविले जातात . सहकारी भात गिरण्या आणि काही सहकारी संस्थांना असे केंद्र दिले जातात . तथापि, यातील बहुतेक केंद्र भ्रष्टाचाराचे अड्डे झाले आहेत.

या केंद्राद्वारे शेतकऱ्यांकडील धानाची खरेदी केली जाते . नंतर भरडाईसाठी हा धान राईस मिलर्सला दिला जातो . प्रत्येक केंद्रावर दररोज किती धानाची खरेदी झाली? याची आकडेवारी केंद्रांकडून जिल्हा पणन व्यवस्थापक (डीएमओ) यांना सादर करणे बंधनकारक असते . शिवाय, डीएमओ कार्यालयाकडून या केंद्रांची नियमीत तपासणी करणेही आवश्यक असते.

दरम्यान, यावर्षीच्या हंगामात डीएमओ कार्यालयाकडून भंडारा जिल्ह्यातील सर्व सातही तालुक्यात मोठ्या संख्येने आधारभूत खरेदी केंद्र देण्यात आले . यातील अनेक केंद्रांनी धानाची खरेदी केली आणि त्यांच्याकडे साठाही आहे . परंतु, अशा केंद्रांना वारंवार भेटी देवून क्षुल्लक कारणावरून वेठीस धरले जात आहे . दुसरीकडे, लाखांदूर तालुक्यातील एका केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी बहुतेक धानाची परस्पर विल्हेवाट लावण्यात आली असून, त्या केंद्रावर खरेदीच्या तुलनेत धान साठा शिल्लक नाही . परंतु, या केंद्राकडे डीएमओ फिरकत नसल्याचे सांगण्यात येते . अर्थात, डीएमओच्या संगनमताने हा गोरखधंदा सुरू आहे.

दोन महिन्यापूर्वी नागपूर येथे धान खरेडी संबंधाने पणन अध्यक्षांनी नागपूर विभागातील चारही जिल्ह्यातील केंद्र चालकांची बैठक घेतली होती . त्यावेळी अनेक केंद्र चालकांनी डीएमओच्या भ्रष्टाचाराचा पाढा वाचला होता . मात्र, कारवाई झाली नाही.

भंडारा जिल्ह्यात शासकीय गोदामांची संख्या अपुरी आहे. परिणामी, भरडाईनंतर तांदळाची साठवणूक करण्यास खाजगी गोदाम भाड्याने घेतले जातात . ही प्रक्रिया सुरू झाली नसल्याने राईस मिलर्सकडून भरडाई सुद्धा थांबली आहे . अर्थात, यामुळे केंद्रावर खरेदी झालेला धान तसाच पडून आहे . दरम्यान, काही केंद्रांविरूद्ध पोलीस तक्रार देणारे डीएमओ मर्जीतल्या केंद्रावर मेहरबान आहेत.

: लोकसेवार्थ :

# पर्यावरण अन् ग्रामविकासाला मोनेरा फाउंडेशनची दिशा

परिसरातील पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जागृती हा हेतू ठेऊन शाहूवाडी (जिल्हा कोल्हापूर) तालुक्यातील महाविद्यालयीन युवक युवतींनी एकत्र येत २०१२ मध्ये मोनेरा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. संस्थेतर्फे देवराई संवर्धन,विद्यार्थ्यांसाठी निसर्ग विज्ञान शिबीर, पर्यटन मार्गदर्शन असे उपक्रम राबविले जातात.

जागतिक वारसा लाभलेला पश्चिम घाट जैव विविधतेने समृद्ध आहे. पश्चिम घाटाचा एक पट्टा कोल्हापूर जिल्ह्यात आहे. या जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी शाहूवाडी तालुक्यातील आंबा गाव परिसरात मोनेरा फाउंडेशन (मेंबर्स ऑफ नॅचरल इकोलॉजिकल रिसर्च असोशिएशन) या स्वयंसेवी संस्थेने आपले कार्य सुरु केले.

संस्था लोकसहभागातून ग्रामीण भागात जैवविविधता संरक्षण, बालशिक्षण, महिला सशक्तीकरण आणि ग्रामविकासामध्ये कार्यरत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच सामाजिक जाणिवबेतून समविचारी मित्रमैत्रिणींना एकत्र करत अजिंक्य बेर्डे यांनी या संस्थेची स्थापना केली. वैभव पाटील हे सांस्थेचे अध्यक्ष असून प्रज्ञा कांबळे या उपाध्यक्ष आहेत.

मोनेरा फाउंडेशन संस्थेचे सदसय स्व खचार्तून विविध उपक्रम लोकांच्या सहकायार्ने राबवित असतात. निसर्ग संवर्धनाबरोबरच संशोधन आणि प्रबोधन वाढीस लागावे,ग्रामीण भागातून जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षण आणि संशोधन क्षेत्राकडे वळावेत यासाठी संस्था प्रयत्नशील असते. महिलांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, आरोग्य शिबिरांचे आयोचजण संस्थेतर्फे केले जाते.



लोकजागर

संस्थेचे सदस्य वाढदिवसानिमित्त दुर्गम वाडी वस्तीवरील शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप करतात. वन्यजीवांसाठी पाणवठे,प्लास्टिकमुक्त जंगल, जंगलातील वाढता मानवी हस्तक्षेप,वन्यजीव आणि मानव संघर्ष वाढीस नेतो याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसून आले कि, उन्हाळ्यात जंगलातील पाणीटंचाईमुळे गवे शेतामध्ये शिरतात.गेल्या चार वर्षांपासून संस्थेने आंबा जंगलातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पाणवठे पुनिरुज्जीवन आणि निगा राखण्याचा उपक्रम सुरु केला. संस्थेतर्फे जंगलातील वाघझरा,मानोली धरन, आंबेश्वर देवराई, पावनखिंड परिसरात स्वच्छता मोहीम राबविली जाते.

जंगल स्वच्छ आणि सुंदर राहावे यासाठी जनजागृती केली जाते. रासायनिक रंगांचे महत्व लक्षात घेऊन संस्थेच्या माध्यमातून विविध गावातील शाळांमधून दरवर्षी नैसर्गिक रंगनिर्मिती आणि त्यांचे महत्व या संदर्भात शाळांमध्ये कार्यशाळा घेल्या जातात.

मलकापूर जवळील मुटकेश्वर टेकडीवर संस्थेच्या मध्यमातून देवराई फुलवली गेली आहे. मोनेरा संस्थेला कोल्हापूर येथील व्ही. टी. पाटील फाउंडेशन तर्फे राजलक्ष्मी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. एकूणच, मोनेरा फाउंडेशन सारखी पर्यावरण संवर्धक संस्था म्हणजे उद्याच्या पिढीचे संरक्षक आहेत असच म्हणता येईल.

■ ■ ■

# संविधान बदलण्याचा प्रयत्न केला तर...

## वडेट्टीवार यांचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :**
हा देश संविधानाने चालतो आणि संविधानच सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. संविधान बदलण्याचा प्रयत्न झाला, तर सत्ता बदलल्याशिवाय राहणार नाही, असा स्पष्ट इशारा काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत दिला. भारतीय गणराज्याच्या ७५व्या वर्षानिमित्त संविधानाच्या गौरवशाली वाटचालीवरील चर्चेत भाग घेताना त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली.

वडेट्टीवार म्हणाले, आपल्याला स्वातंत्र्य, अधिकार आणि कर्तव्य संविधानाने दिली आहेत. संविधान हा कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा श्रेष्ठ ग्रंथ आहे. महात्मा गांधी यांच्या सुचनेवरून देशाच्या संविधान तयार करण्याची जबाबदारी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनी जगातील सर्वोत्तम संविधान देशाला दिलं.

त्यांनी संत परंपरेचा दाखला देत सांगितले की, आपल्या संविधानाचा पाया संतांच्या शिकवणुकीत आहे. महाराष्ट्रात संविधानाची पायमल्ली एका राज्यपालांनी सुरू केली. सर्वोच्च पदावर बसून त्यांनी राजकीय भूमिका घेतल्या, महापुरुषांचा अपमान केला. त्यानंतर दोन पक्ष फोडून महायुती सरकार स्थापन झाले. तीन वर्षांनंतरही या प्रकरणाचा निकाल कोर्टात लागलेला नाही. संविधानात धर्मनिरपेक्षता ही मूलभूत तत्त्व आहे. मात्र सत्ताधारी सतत एका समाजाविरोधात द्वेषपूर्ण वक्तव्य करत आहेत. सरकारी यंत्रणाही दुजाभाव करत आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

# मायाश्री राईस इंडस्ट्रीजवर अधिकाऱ्यांची धाड

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २५ :**
गडचिरोली जिल्ह्यात सीएमआर मिलींगमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाच्या आमदारांनी चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात आवाज बुलंद केला होता. परिणामी, देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज ग्रुपच्या मिलवर १५ ते २० गाड्यांच्या ताफ्याने धाड टाकून चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे.



मात्र धाडीमागचे कारण गुलदस्त्यातच असल्याने व याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी कोणतीही माहिती देत नसल्याने पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात सत्ताधारी पक्षाचे आमदार सुधीर मुनगंटीवार, विरोधी पक्षाचे आमदार नाना पटोले, अभिजीत वंजारी आदींनी गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज येथील मायाश्री इंडस्ट्रीज ग्रुपवर नाना आरोप केले होते . या ग्रुपचा संचालकच जिल्ह्यातील सीएमआर मिलींग गैरव्यवहाराचा मुख्य सूत्रधार असून, शासकीय धान खरेदी केंद्रावरुन उचल केलेला धान परराज्यात विक्री करून शासनाला खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत असल्याबाबत लक्षवेधी सुचनेअंतर्गत सदर सूत्रधारावर ठोस कारवाई करणार का? असा प्रश्न उपस्थित केला होता.

दरम्यान, गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज तालुक्यातील मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज, मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज, महालक्ष्मी राईसमिल, सार्थक राईस इंडस्ट्रीज, विशाल राईसमिल, जय अम्बे राईसमिल या राईसमिल मधून सीएमआर मिलींगमध्ये प्रचंड गैरव्यवहार होत असल्याचा आरोप केला होता. त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री अजित पवार यांनी गैरव्यवहार करणारा तो कोणत्याही पक्षाचा असो, केवढाही मोठा असो, सोडणार नाही, मस्तावलेल्या अधिकाऱ्यांची मस्ती जिरवतो, अशा शब्दात उत्तर दिले . लगेचच त्यांनी लक्षवेधी लावणाऱ्या सर्व आमदारांची बैठक आयोजित केली . परिणामी, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

गडचिरोलीच्या नागरिकांनी २४ फेब्रुवारी २०२२ रोजी गडचिरोली येथील शासकीय गोडाऊनमध्ये देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीजच्या राईसमिल मधून रेशन दुकानात वितरीत करण्याकरीता आलेल्या दोन अवैध ट्रकला रंगेहाथ पकडणे, भारतीय खाद्य निगमच्या कोणत्याही अटी व शर्थीचे पालन न करता सदर तांदूळ गडचिरोलीच्या गोडाऊन मध्ये आणला जाणे, असे विषय विधान परिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी दोन वर्षापूर्वीच्या उपस्थित केले होते . या गंभीर प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून फौजदारी कारवाई संदर्भात शासनाची प्रतिक्रिया मागितली होती. मात्र, चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात मोजक्याच राईसमिलर्सवर आरोप करण्यात आल्याचा हवाला देत सभागृहाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला असला तरी २०२२ मध्ये त्यांनीच हा मुद्दा लावून धरला असल्याने सीएमआर मिलींग गैरव्यवहार प्रकरणी कारवाई होणार का? यावर प्रश्न चिन्ह लागले आहे.

दरम्यान, सोमवार २४ मार्च रोजी अधिकाऱ्यांच्या १५ ते २० गाड्यांचा ताफा मायाश्री राईस इंडस्ट्रीज ग्रुपवर धडकला आणि चौकशी केल्याची माहिती अधिकृत सूत्रांकडून प्राप्त झाली असली तरी चौकशी संदर्भात गोपनीयता बाळगण्यात येत असल्याने प्रकरणाचे एकुणच गुढ अद्यापही कायम आहे.


# सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन स्कूटर लाँच

सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने त्यांच्या OBD-2इ अनुपालन स्कूटर - सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन मालिका (बर्गमन स्ट्रीट आणि बर्गमन स्ट्रीट ए) लॉंच करण्याची घोषणा केली आहे.



अपडेटेड सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन सिरीजच्या सादरीकरणासह, SMIPL च्या संपूर्ण स्कूटर पोर्टफोलिओ (ॲक्सेस, एवेनिस, बर्गमन स्ट्रीट आणि बर्गमन स्ट्रीट ए) आणि मोटारसायकली (V-Strom, GIXXER SF 250, GIXXER 250, GIXXER SF Afd¯f GIXXER) आता OBD-2B अनुरूप आहेत.

सुझुकी एवेनिस आता एका विशेष आवृत्तीमध्ये ऑफर केली जात आहे जी नवीन रंग संयोजनात येते - मेटॅलिक मॅट ब्लॅक नंबर 2 / मॅट टायटॅनियम सिल्व्हर तर बर्गमन स्ट्रीट ए आता बाजारात उपलब्ध असलेल्या विद्यमान रंगांव्यतिरिक्त नवीन मेटॅलिक मॅट स्टेलर ब्लू रंगात उपलब्ध आहे. सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक केनिची उमेदा म्हणाले, सुझुकी मोटरसायकल इंडियामध्ये, आम्ही आमच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करतो आणि त्याचबरोबर नवीनतम नियमांचे पालन सुनिश्चित करतो. संपूर्ण उत्पादन श्रेणीचे OBD-2B अनुपालनाकडे संक्रमण हे अधिक स्वच्छ आणि अधिक शाश्वत रायडिंग अनुभव प्रदान करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


# हिंसाचार प्रकरणी दंगेखोरांकडून नुकसान भरपाई निर्णय योग्य की अयोग्य?

**संतोष साठे (समाजसेवक)**

अलीकडेच औरंगजेबाच्या प्रकरणावरून नागपूर मध्ये काही समाजकंटकांनी जो पूर्वनियोजित हिंसाचार घडविला आणि समाजात अशांतता पसरविण्याचा जो प्रयत्न केला तो घृणास्पद होता. या दंगलीत सार्वजनिक मालमत्तेची अतोनात हानी झाली.प्रचंड नुकसान झाले. हे नुकसान सर्व सामान्यांच्या मालमत्तेचेच होते म्हणूनच या झालेल्या नुकसानाची भरपाई या दंगलीत पकडल्या गेलेल्या दंगल खोरांकडूंच केली जाईल हा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतलेला निर्णय अतिशय योग्य असाच आहे. अशामुळे आता अशी दंगल घडवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या गुंडांना चांगलाच चाप बसणार आहे. हाच निर्णय आता यापुढे असा हिंसाचार करणाऱ्या सवार्नाच लागू व्हावा.

**विनोद शर्मा ( कार्यकर्ता)**

नागपूर मधील दंगलीत जे अतोनात नुकसान झाले त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही नुकसान भरपाई हिंसाचार घडविणाऱ्या लोकांकडून वसूल करण्याचा घेतलेला निर्णय योग्य वाटत असला तरी अशा प्रकरणांमध्ये होरपळले. जातात ते सर्वसामान्य कार्यकर्ते या कार्यकर्त्यांचा बोलविता धनी हा वेगळाच असतो. म्हणूनच या कार्यकर्त्यांना असा विध्वंस करण्यास प्रवृत्त करणाऱ्या विविध राजकीय किंवा सामाजिक पक्षांच्या नेत्यांना या प्रकरणी जबाबदार धरून त्यांच्या पक्षाकडून अशी भरपाई वसूल केली जायला हवी असे वाटते.आणि अशा हिंसाचार प्रकरणी दोन्ही बाजू समजून घेऊन मगच योग्य तो दंडात्मक.निर्णय घेतला जावा अशी अपेक्षा आहे. ■ ■